७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १९ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# पुण्याची मेट्रो पुरंदरपर्यंत नेणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पायाभूत सुविधांच्या विकासामुळे २०३० पर्यंत पुणे देशाचे 'ग्रोथ इंजिन' बनणार

## 'तीन उन्नत मार्गांमुळे पुण्याची वाहतूक कोंडी व प्रदूषणाचा प्रश्न सुटणार' : नितीन गडकरी

## पुणे – शिरुर, तळेगाव – चाकण – शिक्रापूर व हडपसर – यवत या ३ उन्नत मार्ग प्रकल्पांचे भूमिपूजन

**पुणे (दै. संध्या)**



पुणे शहर हे भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) आणि जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख केंद्र बनण्याच्या मार्गावर असून सन २०३० पर्यंत पुणे हे देशातील अत्यंत आधुनिक शहर व प्रमुख विकास केंद्र (ग्रोथ इंजिन) म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. शहराची वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य शासनाने पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत या तीन महत्त्वपूर्ण उन्नत मार्ग प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पांतून शासनाला अनुक्रमे ५००, ३०० आणि १५० कोटी असा एकूण ९५० कोटी रुपयांचा आगाऊ निधी प्राप्त होणार आहे. या प्रकल्पांमुळे पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल, असेही ते म्हणाले. गणेश कला क्रीडा मंच येथे पुणे – शिरूर, तळेगाव – चाकण – शिक्रापूर, हडपसर – यवत या ३ उन्नत मार्गांच्या प्रकल्पांच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी केंद्रीय परिवहन व रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर व हडपसर-यवत या तीन महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीवर व विशेषतः औद्योगिक वसाहतींना जोडणाऱ्या रस्त्यांवरील समस्येवर कायमस्वरूपी उपाय मिळणार आहे. भविष्यातील सार्वजनिक वाहतुकीचा वेध घेत या तिन्ही उन्नत मार्गांवरून पुढील काळात मेट्रो नेण्याचे नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले. या उन्नत मार्गांवरच भविष्यात मेट्रो मार्गिका उभारण्यासाठी आतापासूनच आवश्यक ती डिझाईन तयार केली आहे. यामुळे भविष्यात जेव्हा मेट्रोचे काम सुरू होईल, तेव्हा कोणताही अडथळा निर्माण होणार नाही व या एकत्रित रचनेमुळे मेट्रोच्या खर्चात किमान ४० टक्क्यांची बचत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नव्या पुरंदर विमानतळाशी जोडणी (कनेक्टिव्हिटी) वाढविण्यावरही शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवेघाटामध्ये दुहेरी बोगदा तयार करून त्यातून रस्ता व मेट्रो नेल्यास पुरंदर विमानतळावर पोहोचण्याचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल व विनाअडथळा प्रवास शक्य होईल, यादृष्टीने विचार सुरु आहे. या विमानतळासाठी ५० टक्क्यांहून अधिक भूसंपादन पूर्ण झाले असून, देशाच्या इतिहासात इतक्या वेगाने भूसंपादन होण्याचा हा विक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच १७३ किलोमीटरचा बाह्य व ८६ किलोमीटरचा अंतर्गत वर्तुळाकार रस्ता (रिंग रोड) दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून यामुळे शहरातील वाहतूक कोंडी ३० टक्क्यांनी कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पुणे व पीएमआरडीए क्षेत्राच्या पुढील ३० ते ४० वर्षांच्या विकासाचा विचार करताना पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यावश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. वाढती लोकसंख्या लक्षात घेता केवळ पाण्याचे नवे स्रोत शोधण्यावर अवलंबून न राहता, वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावर शासनाने भर दिला आहे. जायका व जागतिक बँकेच्या सहकार्याने अनेक जलशुद्धीकरण प्रकल्प (एसटीपी) उभारण्यात येत असून, नद्या व तलावांना प्रदूषित करणारे शहरी सांडपाणी शुद्ध करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

पुणे शहर हे अभियांत्रिकी व नवउद्यमांचे (स्टार्टअप) प्रमुख केंद्र असून पुढील काळात ते अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) व जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख हब बनेल. देशातील एकूण जीसीसीपैकी जवळपास ३५ टक्के केंद्रे एकट्या पुण्यात उभी राहत आहेत. इतर शहरांसारखी पुण्याची वाहतूक कोंडीची अवस्था होऊ नये, यासाठी हे सर्व प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण केले जातील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

- पान ७ वर

## ज्येष्ठ समाजवादी नेते, माजी आमदार डॉ. कुमार सप्तर्षी यांचं निधन

### पुण्यात सोमवारी होणार अंत्यसंस्कार

**पुणे (दै. संध्या)**



ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, 85 व्या वर्षी त्यांनी अखरेचा श्वास घेतला. त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. विधिमंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनानंतर समाजावादी विचारवंत, पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. कुमार सप्तर्षी यांचा मुलगा कबीर सप्तर्षी इंग्लंडहून आल्यानंतर सोमवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील, अशी माहिती निकटवर्तीयांनी दिली. सोमवारी सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी कोथरुडमधील गांधी भवन इथं ठेवलं जाईल, त्यानंतर अंत्यसंस्कार होतील, अशी देखील माहिती संबंधितांनी दिली. दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी कुमार सप्तर्षी यांना सोशल मीडियातून श्रद्धांजली वाहिली आहे.

ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत.

## ठाकरेंच्या फुटलेल्या सहा खासदारांची खासदारकी वाचली

### शिंदेंच्या शिवसेनेत विलिनीकरणाला मंजुरी



**मुंबई (दै. संध्या)**

ठाकरेंच्या शिवसेनेतून बंडखोरी करत शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिलेल्या सहा फुटीर खासदारांबाबत लोकसभा सचिवालयाने एक मोठा निर्णय घेतला आहे. या सहा फुटीर खासदारांच्या गटाच्या विलिनीकरणाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सहा खासदार आता शिंदेंच्या शिवसेनेचे अधिकृत खासदार बनले आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर या सहा खासदारांनी वेगळा गट स्थापन केला. नंतर या गटाने शिंदेंच्या शिवसेनेत विलिनीकरण केलं. आता या विलिनीकरणावर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शिक्कामोर्तब केलं आहे. त्यामुळे या सहाही खासदारांची खासदारकी वाचली असून ते आता शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार म्हणून काम करणार आहेत. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, "ज्या लोकांनी या खासदारांना निवडून दिलं आहे त्यांची कामं होणं महत्त्वाची आहेत. आमच्याकडे आलेल्या सहा खासदारांनी त्यांच्या मतदारसंघाच्या विकासासाठी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांना मोठा विकासनिधी दिला जाईल." आधीच एकटा फुटीचा सामना करावा लागलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक मोठा धक्का बसला. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेतून निवडून आलेल्या सहा खासदारांनी त्यांची साथ सोडत शिंदेंच्या शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, यवतमाळचे खासदार संजय देशमुख, परभणीचे खासदार संजय जाधव, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, मुंबई दक्षिणचे खासदार संजय दिना पाटील आणि शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरेंचा समावेश आहे. या सहा खासदारांनी आधी आपला एक वेगळा गट स्थापन केला. त्यानंतर या गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिली. नंतर या गटाने शिंदेंच्या शिवसेनेत अधिकृतपणे विलिनीकरणाचा निर्णय घेतला. या सगळ्यावर ठाकरेंच्या शिवसेनेकडून आक्षेप घेण्यात आला. मात्र अखेर लोकसभा अध्यक्षांनी या सहा खासदारांच्या विलिनीकरणाला मान्यता दिली.

### ठाकरेंचं कार्यालय काढून घेतलं जाणार

ठाकरेंच्या 9 खासदारांपैकी दोन तृतीयांश 6 खासदार फुटल्यानं मोठा पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे ठाकरेंच्या पक्षाचे लोकसभेतील कार्यालय काढून घेतलं जाण्याची शक्यता आहे. कारण नियमानुसार, एखाद्या पक्षाचे लोकसभा आणि राज्यसभेतील मिळून किमान 5 खासदार असणं गरजेचं आहे. तरच त्यांना एक कार्यालय दिलं जाऊ शकतं. पण आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लोकसभेमध्ये केवळ तीन खासदार उरले आहेत.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## बनावट गुटखा प्रकरणात भाजप नेत्याच्या जवळच्या नातेवाईकावर गुन्हा दाखल

# तुकाराम मुंढे यांचा भाजपच्या बड्या नेत्याला दणका

**मुंबई (दै. संध्या)**



अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे गेल्या काही काळापासून ॲक्शन मोडमध्ये आहेत. मुंढे यांच्या नेतृत्वातील पथकाने राज्यातील विविध ठिकाणी कारवाई करत अवैध धंदे करणाऱ्या लोकांवर कठोर कारवाई केलेली आहे. अशातच आता तुकाराम मुंढे यांच्या पथकाने अकोल्यात केलेल्या गुटखा कारवाई प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. बनावट गुटखा कारखाना प्रकरणात अकोला महापालिकेचे पाणीपुरवठा विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांवर गुन्हा दाखल झाला आहे. अभिषेक गई असं गुन्हा दाखल झालेल्या अभियंताचे नाव असून ते भाजपचे माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेवक विनोद मापारी यांचे सख्खे भाचे आहेत. अकोल्यात एमआयडीसी परिसरात 2 गुटख्यांच्या कारखान्यावर FDA ने छापे टाकले होते. यावेळी तब्बल दीड कोटींच्या जवळपास मुद्देमाल जप्त झाला होता. तर दोन्ही गुटखा कारखाने राजकीय पदाधिकारी म्हणून ओळख असलेल्या गौरव शर्मा नामक व्यक्तीचे असल्याचे तपासात समोर आले. सध्या तो फरार आहे. मात्र, दुसरीकडे यातील एक गुटखा कारखाना हा महापालिकेतील कनिष्ठ अभियंता तथा भाजपचे माजी उपमहापौराचा भाचा अभिषेक गई यांच्या मालकीच्या जागेत होता. या प्रकरणात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईमुळे राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. अभिषेक गई याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर भाजपचे माजी उपमहापौर विनोद मापारी यांनी मौन सोडलं आहे. एमआयडीसीतील ते गोदाम अधिकृतपणे 500 रुपयांच्या बॉण्डवर भाडे करारनामा म्हणून भाडेतत्त्वावर दिले होते. मात्र इथे सुरू असलेल्या गुटखा कारखान्याबद्दल मला किंचितही कल्पना नव्हती. दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे अकोला जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा आणि पान मसाल्याच्या अवैध व्यवसायात गुंतलेल्या टोळ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या रॅकेटमागील इतर संबंधितांचा शोध सुरू आहे. आता आगामी काळात यातील आणखी काही आरोपी सापडण्याची शक्यता आहे.

### FDA ची म्हशीच्या गोठ्यावर धाड, जास्त दुधासाठी दिली जाणारी शेकडो ऑक्सिटोसिन इंजेक्शन्स जप्त

राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नातील भेसळ आणि बेकायदेशीर औषधांचा वापर करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर उल्हासनगरमध्ये एक मोठी कारवाई समोर आली आहे. म्हशींचे दूध उत्पादन वाढवण्यासाठी बेकायदेशीरपणे दिली जाणारी आणि शासनाने बंदी घातलेली तब्बल 612 ऑक्सिटोसिन इंजेक्शन्स एफडीएच्या पथकाने जप्त केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, उल्हासनगर कॅम्प क्रमांक 3 मधील ओटी सेक्शन, जसलोक हायस्कूल परिसरात असलेल्या प्रकाश वाधवानी याच्या म्हशीच्या गोठ्यावर एफडीएच्या पथकाने हा छापा टाकला. या छाप्यात जास्त दुधासाठी जनावरांना टोचली जाणारी 612 प्रतिबंधित इंजेक्शन्स आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्यांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे.

ऑक्सिटोसिन या औषधाचा वापर जनावरांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक आणि क्रूर मानला जातो. या इंजेक्शन्समुळे जनावरांना प्रचंड त्रास होतो. इतकेच नाही तर, अशा प्रकारे ऑक्सिटोसिन देऊन काढलेल्या दुधाचे सेवन केल्यास मानवी आरोग्यावर, विशेषतः लहान मुलांवर आणि गरोदर महिलांवर गंभीर दुष्परिणाम होण्याची भीती वैद्यकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते. याच कारणामुळे या औषधाच्या विक्रीवर आणि वापरावर शासनाने कायद्याने पूर्णपणे बंदी घातलेली आहे.

# ७२व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा

## 'आर्टिकल ३७०'ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार, 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी' सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

**मुंबई (दै. संध्या)**



आदित्य धर यांच्या 'आर्टिकल 370' चित्रपटाला शनिवारी 72व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 2024 वर्षातील सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार मिळाला. तर, 'श्रीकांत' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आणि यामी गौतमला प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला.

त्याचबरोबर, 'ब्रमायुगम'साठी ममूटी आणि 'चंदू चॅम्पियन'साठी कार्तिक आर्यन यांना संयुक्तपणे प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. घोषित विजेत्यांमध्ये तमिळ चित्रपट 'रायन'ला सर्वोत्कृष्ट तमिळ चित्रपट, 'कमेटी कुर्रोल्लू'ला सर्वोत्कृष्ट तेलुगु चित्रपट, 'लाहरी'ला सर्वोत्कृष्ट ओडिया चित्रपट, 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट आणि 'सुनीता'ला सर्वोत्कृष्ट मणिपुरी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला.

'कॅप्टन मिलर' आणि 'मेय्याझगन' यांना विशेष उल्लेख देऊन सन्मानित करण्यात आले. गैर-फिचर चित्रपटांच्या श्रेणीत 'भंगार (ऑब्सोलीट)'ला सर्वोत्कृष्ट गैर-फिचर चित्रपट म्हणून निवडण्यात आले. हिंदी चित्रपट 'मैं निदा'ला सर्वोत्कृष्ट कला आणि संस्कृती चित्रपटाचा पुरस्कार मिळाला, तर 'हमसफर'ला सर्वोत्कृष्ट लघुपटाचा सन्मान देण्यात आला.

राष्ट्रीय पुरस्कारांची स्थापना १९५४ मध्ये झाली. सुरुवातीला, भारतीय चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन देणे आणि विविध भाषांतील सर्वोत्कृष्ट चित्रपटांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. त्यावेळी याला चित्रपटांसाठीचे राज्य पुरस्कार म्हटले जात असे. हे पुरस्कार सर्वप्रथम तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पहिले राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (१९५४)

सर्वोत्कृष्ट चित्रपट (राष्ट्रपती सुवर्णपदक): श्यामची आई – मराठी चित्रपट
सर्वोत्कृष्ट माहितीपट: महात्मा गांधी
सर्वोत्कृष्ट बालचित्रपट: जागृती

सुरुवातीला, हे पुरस्कार केवळ सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट माहितीपट आणि सर्वोत्कृष्ट बालचित्रपट यासाठीच दिले जात होते. तथापि, कालांतराने देशभरातील विविध भाषांतील चित्रपटांसाठी श्रेणी जोडण्यात आल्या.

१९६८ मध्ये, त्यांचे नाव बदलून "राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार" असे ठेवण्यात आले.

# संपादकीय

## बैलाविना शेतीला मजा नाही!

**रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.**

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो.

## सुविचार

चंद्र आणि चंदनापेक्षा सज्जनांचा सहवास शीतल असतो.

## गुरु वचन

### सर्वोत्कृष्ट शाकाहार : लजपत राय सभरवाल

आपण सर्व जीवांना ईश्वराचा अंश मानतो म्हणून आपल्या धर्मग्रंथांमध्ये मांसाहार वर्ज्य करण्यास सांगितले आहे. महाभारतात भिष्म पितामह यांनी मांस खाणारा, मांस विकणारा व मांसासाठी जीवाची हत्या करणाऱ्यांना दोषी ठरवले आहे. म्हणून सर्व धर्मग्रंथांमध्ये शाकाहारच सर्वोत्कृष्ट आहार असल्याचे सांगितले आहे. संत, महापुरुष यांनी सुद्धा सांगितले आहे की, शाकाहारामुळे आपले विचार सकारात्मक होतात तसेच दया व साहस गुण विकसित होतात.

विचारांवर प्रभाव

शाकाहारामुळे आपले विचार प्रभावित होतात. जर आपणास मन, वचन व कर्माने पवित्र व्हायचे असेल तर आपण शाकाहार म्हणजे फळ-भाज्यांचा पूर्ण आहारच घ्यायला हवा. खरंतर, बहुतांश मानवी मनाच्या एका कोपऱ्यात पशु व्यवहार दडलेला असतो. जर आपणास त्या पशुत्वातून मुक्त व्हायचे असेल तर मांसाहार सोडायलाच पाहिजे.

आपण फक्त जीभेचे चोचले पुरवण्यासाठी दुसऱ्या जीवांची हानी करणे टाळून त्यांच्या संरक्षणासाठी सतत प्रयत्नशील राहायला हवे म्हणून पौष्टिक व ज्या आहारामुळे कुठल्याही जीवाची हानी होणार नाही असा आहार घ्यायला हवा. आहार साधन असून, साध्य नाही. शाकाहार कुठल्याही व्यक्तीच्या जगण्याची शैली निर्धारित करतो. असा आहार मन व शरीराला मजबूत करतो. शाकाहारामुळे फक्त आपले विचारच शुद्ध न होता आपल्यात दया, क्षमा सारख्या भावनांचा विकास होतो. आपण जगण्यासाठी जेवण करतो, जेवणासाठी जगत नाही याचा विसर पडायला नको. म्हणूनच आहार एक साधन असून साध्य नाही.

## उपदेशकथा

### समानता

एकदा महाराज अजितसिंह यांनी दरबारी लोकांसाठी एक नृत्याचा कार्यक्रम आयोजिला होता. स्वामी विवेकानंद त्यांचे पाहुणे असल्याने महाराजांनी त्यांनाही निमंत्रण पाठवले पण स्वामीजींनी त्यांना स्पष्ट नकार कळविला आणि आपण संन्यासी असल्याने अशा नाचगाण्याच्या कार्यक्रमांना आपण उपास्थित राहू शकत नाही, असे सांगितले. त्या नर्तकीला जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा तिला फार दु:ख झाले. स्वामीजींच्या नकाराला उत्तर म्हणून तिने सूरदासाचे एक भजन आळवण्यास प्रारंभ केला. 'प्रभू मेरो अवगुण चित न धरो : समदर्शी है नाम तिहारो, चाहे तो दूर करो।' हे प्रभू आपण माझे अवगुण मनात ठेवू नका. आपण सर्वांकडे समभावाने पाहणारे आहात! लोखंडाच्या एका तुकड्याची मूर्ती बनते तर दुसऱ्या तुकड्यापासून खाटकाचा सुरा बनतो पण परिसस्पर्श झाला की, त्या दोन्ही लोखंडाच्या तुकड्यांचे सोनेच बनते. तसंच हे देवा! आपण माझ्यातील दुर्गुणांकडे न बघता आतील माणसाकडे बघा! आर्तपणे आळवलेले हे सूरदासाचे भजन स्वामीजींच्या कानावर पडले तेव्हा त्यांचे अंत:करण हेलावले. ते स्वत:शीच म्हणाले, 'तू संन्यासी आहेस ना? सगळीकडे एकच एक ब्रह्म पाहतोस ना? मग त्या नर्तकीतल्या ब्रह्माला तू असं दूर का लोटतोस? सगळीकडे असणारं ब्रह्म तिच्यातही आहे! या विचाराशी ते दरबारात धावले आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी ते संपूर्ण भजन ऐकले. नंतर त्यांनी त्या नर्तकीला 'आई' असे संबोधून तिची क्षमा मागितली! या प्रसंगाने स्वामीजींच्या मनातील उरला सुरला भेदभावही नष्ट झाला .

कथा उपदेश : जात-पात किंवा जन्मजात, उच्चनीचता मानू नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | १८:११:४० |
| १९ जुलै २०२६ | योग:परिध १९:२२:१६ |
| रविवार | करण:कौलव १५:३०:४० |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:तैतिल |
| आषाढ शके | २७:३०:०९+ |
| संवत्- १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर - पराभवनाम | चन्द्र:कन्या |
| अयन- दक्षिणयन | हिजरी सन् - १४४८ |
| मास- आषाढ | मुस्लिम मास - सफर |
| ऋतु- सौर वर्षा | तारीख - ४ |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:षष्टी २७:३०:०९+ | कुमारषष्ठी |
| नक्षत्र:उत्तराफाल्गुनी | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०१५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 1 | | | 6 | 8 | 4 |
| 4 | 3 | | | | 6 | 7 | | |
| 8 | 6 | | 5 | | 4 | | | 3 |
| | | | | 6 | | | 1 | |
| | | 3 | 8 | | 7 | 2 | | |
| | 8 | | | 5 | | | | |
| 2 | | | 3 | | 9 | | 7 | 6 |
| | | 6 | 7 | | | | 2 | 1 |
| 7 | 1 | 8 | | | 5 | 4 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०१४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | 3 | 2 | 1 | 5 | 4 | 6 | 9 |
| 6 | 1 | 5 | 4 | 9 | 3 | 2 | 8 | 7 |
| 9 | 2 | 4 | 6 | 8 | 7 | 1 | 3 | 5 |
| 5 | 9 | 1 | 8 | 6 | 2 | 3 | 7 | 4 |
| 2 | 3 | 6 | 1 | 7 | 4 | 9 | 5 | 8 |
| 4 | 8 | 7 | 5 | 3 | 9 | 6 | 1 | 2 |
| 7 | 5 | 2 | 3 | 4 | 1 | 8 | 9 | 6 |
| 1 | 6 | 9 | 7 | 2 | 8 | 5 | 4 | 3 |
| 3 | 4 | 8 | 9 | 5 | 6 | 7 | 2 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५५३ - मेरी पहिली इंग्लंडच्या राणीपदी.
- १६९२ - अमेरिकेतील सेलम शहरात चेटकीण असल्याच्या आरोपाखाली ५ स्त्रीयांना फाशी देण्यात आली.
- १८७० - फ्रांसने प्रशिया विरुद्ध युद्ध पुकारले.
- १९१२ - अमेरिकेतील हॉलब्रुक शहरावर उल्कापात. सुमारे १६,००० उल्का जमिनीपर्यंत पोचल्या.
- १९४० - दुसरे महायुद्ध - केप स्पादाची लढाई.
- १९४७ - म्यानमारच्या सरकारचा योजित पंतप्रधान आँग सान व ६ मंत्र्यांची हत्या.

### राष्ट्रीय

- १३०९ - प्रसिद्ध संत विसोबा खेचर यांनी समाधी घेतली.
- १९६९ - देशातील १४ महत्त्वाच्या बँकांचे राष्ट्रीयीकरण वटहुकूम जारी.
- २००१ - ओरिसात महापूर, ५० लाख लोक बेघर.

### जन्म

- १८१४ - सॅम्युअल कॉल्ट, अमेरिकन संशोधक.
- १८३४ - एदगा दगा, फ्रेंच चित्रकार.
- १८७६ - जॉन गन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८७७ - आर्थर फील्डर, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८९४ - ख्वाजा नझिमुद्दीन, पाकिस्तानचा दुसरा पंतप्रधान.
- १८९६ - ए.जे. क्रोनिन, स्कॉटिश लेखक.

### निधन

- ५१४ - पोप सिमाकस.
- ९३१ - उडा, जपानी सम्राट.
- १९४७ - आँग सान, म्यानमारचा स्वातंत्र्यसैनिक.
- १९६५ - सिंगमन ऱ्ही, दक्षिण कोरियाचा पहिला राष्ट्राध्यक्ष.
- १९८० - निहात एरिम, तुर्कस्तानचा पंतप्रधान.

## : SMS :

Teacher: "So we proved that when 'A' is equal to 'B' and 'B' is equal to 'C' then 'A' equal to 'C'. Ron give me an example for this."
Ron: "I love my teacher, my teacher loves her daughter, therefore I love my teacher's daughter..."

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.६ | २५.६ |
| अहमदनगर | ३२.८ | २२.६ |
| अकोला | ३५.४ | २९.७ |
| अमरावती | ३४.८ | २९.८ |
| बीड | ३६.१ | २७.१ |
| भंडारा | ३१.९ | २५.१ |
| बुलढाणा | ४६.८ | ३२.७ |
| चंद्रपूर | ३५.७ | २७.३ |
| चेन्नई | ३८.३ | २७.३ |
| नवी दिल्ली | ४५.२ | ३४.६ |
| धुळे | ३६.८ | २६.४ |
| गोंदिया | २७.२ | २४.४ |
| जळगाव | ३६.३ | २८.९ |
| कोल्हापूर | २६.५ | २२.१ |
| लातूर | ३२.६ | २४.३ |
| मुंबई | ३५.२ | ३२.३ |
| नागपूर | ३४.१ | २६.७ |
| नांदेड | ३४.८ | २७.१ |
| नंदूरबार | ३३.५ | २५.९ |
| नाशिक | ३०.६ | २२.७ |
| पुणे | २६.९ | २२.७ |
| पंढरपूर | ३५ | २५.१ |
| सातारा | २९.४ | २१.१ |
| सांगली | २७ | २२.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष** : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण नवीन संबंधांचा फायदा होईल. धाडसाने कामे होणार नाही. काळजी घ्या.

**तुळ** : शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व कामात वाढ होईल.अधिकारी वर्गाचे सहकार्य मिळेल.

**वृषभ** : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील. वादापासून दूर राहावयास हवे.

**वृश्चिक** : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**मिथुन** : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व प्रतिष्ठा वाढेल. सहकाऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल. धर्माविषयी आस्था वाढेल. कर्ज आणि खर्चात कपात करा.

**धनु** : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल. आर्थिक स्थिती खालावलेली असेल.

**कर्क** : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल.

**मकर** : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल.एखाद्या जवळच्याच्या व्यवहारात प्रतिकूलता येईल.


**सिंह** : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल. परिजनांमुळे तणाव होऊ शकतो.

**कुंभ** : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

**कन्या** : शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम मुलांमुळे तणाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.

**मीन** : शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील. अडचणी निर्माण होऊ शकतात.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०१५



### आडवे शब्द

१. प्रवासात उपयोगी
३. पाण्याचा साठा, तळे
७. बळजबरीचा मुक्काम
११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे
१२. धातूचा नाजूक तंतू
१३. लाकडाची उत्कृष्ट जात
१४. समुदाय, गट
१६. एक नैसर्गिक शीतपेय
१७. थडगे
१८. मृत्यू नसलेला
१९. मान, प्रतिष्ठा, बूज
२०. सुकुमार
२१. चंदन उगाळण्याचा दगड
२४. मधली खोली
२६. गावातील देवाचा उरुस
२७. 'एनओसी' मराठीत
३१. पुढारी
३२. लढाई, चकमक
३३. जागृत, चकमक
३३. जागृत, स्थान
३५. हुशार, चलाख
३७. श्रेष्ठ पुरुष
३९. सुतळीचे कापड
४२. तिंबा!
४४. पुत्र, मुलगा
४६. फसविणे
४८. कान व डोळे ताठ करणे
५०. सैन्याचा मालपुरवठा
५२. वजा
५३. सरस्वतीचे एक नाव
५६. माराची खूण
५७. क्षण (हिंदी)
५८. ओलसर हवा
६०. पुन्हा पुन्हा
६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी
६४. पुंकेसर
६५. मत्स्य
६७. बोलणे
६९. मुलगा
७०. टाळ्यांचा जोरदार आवाज
७१. अगम्य
७३. खटला
७५. स्तुती करणारा
७६. अस्वल
७७. जन्म, मृत्यू
७८. तटबंदी

### उभे शब्द

१. चाहता
२. यामुळे रामायण घडले
३. जन्मदात्री
४. नेहमी बुजणारा
५. बाण
६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान
७. ठाण्याचा रहिवासी
८. वाघाची मावशी
९. भीती, भय
१०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव
१३. सामोपचार
१५. भाताला दिलेला आकार
१८. धाकटा भाऊ
२०. हुक्की, लहर
२१. च्या बरोबर
२२. जय-पराजय
२३. कर्ज, उपकार
२४. फक्त, केवळ
२५. जाते फिरतानाचा आवाज
२६. जन्मापासून
२७. ख्रिसमस
२८. शिव्याशाप
२९. हत्तीचा शिक्षक
३०. वारा
३२. वर्ष
३४. थंडीने गार पडणे
३६. दारूचा एक प्रकार
३८. आवाज, गोंगाट
४०. रोखलेली नजर
४१. एक जंगली फूल
४३. वरपांगी
४५. सोसाट्याचा वारा
४७. अवाढव्य, भव्य
४९. उणे
५१. नवऱ्याची दुसरी पत्नी
५२. संयम सुटलेला, अधीर
५४. बरणीला लावण्याचे फडके
५५. विहीर, --नलिका
५७. मान्यतापत्र
५९. नंतर
६०. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
६१. थेट, सरळ
६२. धोबी
६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात
६६. बडबड
६८. नोकरी
७१. शर्त, पण
७२. फोडातील द्रव
७४. डावा

### जम्बो शब्दकोडे क्र. १०१४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.श्रीराम जयराम जयजयराम २.अट १२.हित १३.जनन १४.मम १५.रमावर १६.तबला १७.खस १८.तारा २०.रावण २२.हौस २४.जर २५.कडक २७.गदा २९.खळखळाट ३०.दादला ३१.तुलसीदास ३३.मदन ३४.काजळ ३६.पुरा ३८.हमाल ३९.गारवा ४०.सर्वत्र ४१.हालचाल ४२.महाशय ४४.नफा ४६.पातक ४७.वार ४९.वाकडा ५२.कवच ५४.खरवस ५६.काजळी ५८.कडप्पा ५९.लामणदिवा ६०.रानटी ६२.सखी ६३.लगत ६५.बत्ती ६६.तलवार ६९.मदार ७०.बेकायदा ७२.डाकीण ७३.गरज ७४.सरदार ७५.सदरा ७७.रबर ७८.वंदन ८१.जागरण ८२.रातवा ८३.कारखाना

उभे उत्तर : १.श्रीमंत २.महिला ३.जत ४.राजस ५.मन ६.जनता ७.जम ८.यमराज ९.मरण १०.अवघड ११.टर १७.खसखस १९.रागीट २१.वरदान २३.पाखर २५.कलाकार २६.कमळ २७.गल २८.दासीपुत्र ३१.तुळस ३२.दारा ३३.मलम ३५.जवान ३७.लोलक ३८.हलवा ३९.गायक ४१.हातचलाखी ४३.शवासन ४५.फासळी ४६.पाव ४८.रखवालदार ५०.डाका ५१.चाकवत ५२.कप्पा ५३.आणखी ५५.वरात ५७.जबाबदार ६१.टीकाकार ६२.सरडा ६४.गरजवंत ६७.लवाद ६८.रणरण ६९.मगर ७०.बेसन ७१.यदा ७५.सख्य ७६.राजा ७९.दवा ८०.ताना

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# शिक्षण संस्था चालवताना नैतिकतेशी तडजोड नको : ॲड.एस.के. जैन

## पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढीतर्फे स्व. मो. गो. चाफेकर जीवन गौरव पुरस्कार जैन यांना प्रदान

पुणे (दै. संध्या)

शिक्षण संस्था आर्थिकदृष्ट्या मजबूत असल्याशिवाय ती चालत नाही, परंतु ते करताना नैतिकतेवर तडजोड होता कामा नये. पैसा कितीही मिळू शकतो; परंतु आपण किती लोकांचे जीवन घडवणार की बिघडवणार, याचा विचार करायला हवा. शिक्षण संस्था चालवायची आहे म्हणून काही गोष्टी कराव्या लागतात, या वृत्तीला रोखण्याचा प्रयत्न झाला नाही, तर समाजाचे भविष्य चांगले होईल, असे मला वाटत नाही. सगळ्याच शिक्षण संस्था वाईट नाहीत, असे मत ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. एस. के. जैन यांनी व्यक्त केले.

पुणे माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित, पुणे यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक गुरुवर्य स्व. मोरेश्वर गोपाळ चाफेकर यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात येणारा स्व. मो. गो. चाफेकर जीवन गौरव पुरस्कार २०२६ ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ॲड. एस. के. जैन यांना प्रदान करण्यात आला. सदाशिव पेठ येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या सभागृहात पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, उपमहापौर परशुराम वाडेकर, संस्थेचे अध्यक्ष महादेव माने, उपाध्यक्ष डॉ. कल्याण वाघ, खजिनदार संजय लोंढे, मानद सचिव संदीप घोलप तसेच संचालक मंडळातील राज मुजावर, शिवाजी कामथे, विजय कचरे, धोंडीबा तरटे, डॉ. मंगल शिंदे, पुष्पक कांदळकर, दत्तात्रय हेगडकर, हर्षा पिसाळ, भगवान निक्रड आणि तज्ज्ञ संचालक विठ्ठल रणशूर उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप रुपये २५,००१/- चा धनादेश, मानपत्र, पुणेरी पगडी आणि शाल असे होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर ॲड. एस. के. जैन यांनी संस्थेच्या शैक्षणिक कार्यासाठी ५० हजार रुपयांचा धनादेश दिला.

डॉ. एस. के. जैन म्हणाले, शिक्षक हे शैक्षणिक संस्थांचे नोकर नाहीत. शिक्षण संस्थेने शिक्षकांसाठी मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक बनावे. शिक्षकांना केवळ आदेश देण्याचे काम संस्थेने करू नये. संस्थेचा प्रमुख घटक हा शिक्षक असतो. त्यांचा योग्य सन्मान केला पाहिजे.

शिक्षकांना नोकरीसाठी मुलाखतींना जावे लागणे ही वेदनादायी बाब आहे. शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) खरोखर गरज आहे का, याचाही विचार व्हायला हवा. शिक्षकांना समाजात सन्मानाने शिक्षक म्हणून काम करता आले पाहिजे. शिक्षकांचा मान जोपर्यंत राहील, तोपर्यंत समाज योग्य मार्गावर राहील, असेही जैन यांनी सांगितले.

डॉ. अनिल पाटील म्हणाले, जगातील सर्वोत्तम अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून आपल्या दारात आणून ठेवला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे प्रथमच शिक्षण क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय काम झाले आहे.


खाजगी क्षेत्रात नोकरी मिळविण्यासाठी केवळ पदवी नव्हे, तर कौशल्य महत्त्वाचे आहे. केवळ पारंपरिक शिक्षण घेऊन उपयोग नाही. जग झपाट्याने बदलत आहे आणि त्या बदलांनुसार आपणही स्वतःमध्ये बदल घडवून आणला पाहिजे. तुम्ही कसे शिकाल आणि कसे शिकवाल, याला आज विशेष महत्त्व आहे. उद्याच्या गरजांनुसार तुम्ही विद्यार्थ्यांना शिक्षण देत असाल, तरच त्याला खरे महत्त्व आहे. कारण आजच्या काळात स्पर्धा मोठी आहे.



प्रास्ताविकात महादेव माने म्हणाले, सहकार्याच्या भावनेतून पतपेढीची स्थापना झाली. आपल्या संस्थेचे ध्येय शिक्षकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सहकार, विश्वास आणि पारदर्शकतेच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण आर्थिक सेवा उपलब्ध करून देत त्यांची सर्वांगीण प्रगती साधणे हे आहे. याच ध्येयाने प्रेरित होऊन संस्था केवळ आर्थिक व्यवहारांपुरती मर्यादित न राहता अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवत आहे.

ते पुढे म्हणाले, आधार योजना, देश-विदेश सहल, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला, निवृत्त सभासदांचा सन्मान, गुणवंत सभासद व गुणी पाल्यांचा गौरव तसेच तिळगूळ समारंभ अशा विविध उपक्रमांद्वारे संस्था सभासदांच्या जीवनात आनंद, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य करीत आहे. डॉ. मंगल शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. संजय लोंढे यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भगवान जगन्नाथ रथयात्रेनिमित्त रविवारी पुणे शहराच्या मध्यभागात वाहतूक बदल

पुणे (दैनिक संध्या) : इस्कॉन तर्फे रविवारी (दि. १९) भगवान जगन्नाथ रथयात्रा काढण्यात येणार आहे. रथयात्रेनिमित्त मध्यभागातील वाहतूक व्यवस्थेत दुपारी एक ते सायंकाळी साडेसात या वेळेत बदल करण्यात येणार आहे. टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालय चौकातून रथयात्रेचा प्रारंभ होणार आहे. टिळक रोड, बाजीराव रोड, शनिपार चौक, नगरकर तालीम चौक, लक्ष्मी रोड, उंबऱ्या गणपती चौक (शगुन चौक), रमणबाग चौक, ओंकारेश्वरमंदिर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल, झाशीची राणी लक्ष्मीबाई चौक, जंगली महाराज रस्ता, डेक्कन जिमखाना, खंडोजीबाबा चौक, टिळक चौक, टिळक रोड या मार्गाने रथयात्रा जाणार आहे. स. प. महाविद्यालयाजवळ रथयात्रेची सांगता होणार आहे. या यात्रेनिमित्त रविवारी दुपारी एक ते सायंकाळी साडेसात या वेळेत वाहतूक बदल करण्यात येणार आहेत. वाहतूक बदल तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आले असून, वाहनचालकांनी सहकार्य करावे’, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी केले आहे. स. प. महाविद्यालयातून रथयात्रा सुरू झाल्यानंतर टिळक रस्त्याने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी लालबहाद्दुर शास्त्री रस्ता, सेनादत्त चौक, दांडेकर पूल चौकातून इच्छितस्थळी जावे. पूरम चौकातून टिळक रस्त्याकडे येणाऱ्या वाहनचालकांनी मित्रमंडळ चौकातून इच्छितस्थळी जावे. रथयात्रा पूरम चौकातून बाजीराव रस्त्यावर आल्यानंतर वाहनचालकांनी पूरम चौकातून टिळक रस्तामार्गे इच्छितस्थळी जावे. रथयात्रा लक्ष्मी रस्ता परिसरात आल्यानंतर वाहनचालकांनी बाजीराव रस्ता, अप्पा बळवंत चौक, शनिवार वाडा या मार्गाने इच्छितस्थळी जावे. रमणबाग ते ओंकारेश्वर दरम्यान रथयात्रा आल्यानंतर वाहन चालकांनी नदीपात्रातील रस्ता किंवा लक्ष्मी रस्त्याचा वापर करावा.



### डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ 20 जुलैला राज्यभर आरोग्यसेवा बंद

पुणे (दैनिक संध्या) : डोंबिवलीतील शास्त्रीनगर महापालिका रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेने (आयएमए) सोमवारी, २० जुलै रोजी राज्यभर २४ तास नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. सोमवारी सकाळी ६ वाजल्यापासून मंगळवार सकाळी ६ वाजेपर्यंत हे आंदोलन होणार असून, बाह्यरुग्ण विभाग, नियोजित शस्त्रक्रिया आणि इतर नियमित वैद्यकीय सेवा बंद राहतील. मात्र, आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, प्रसूतीसेवा आणि जीवनावश्यक उपचार सुरू राहतील. मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास ९ ऑगस्टपासून राज्यभर बेमुदत आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. रुग्णांविरोधात हा निर्णय नसून आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आणि आरोग्य व्यवस्थेतील वाढत्या हिंसाचाराविरोधात आहे, असे आयएमएने नमूद केले आहे. आंदोलनात ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथीसह विविध वैद्यकीय शाखांतील डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी आणि आरोग्य क्षेत्रातील विविध संघटनांचा सहभाग असणार आहे. संघटनेने राज्य सरकारकडे डोंबिवलीतील हल्ल्यातील आरोपींवर कठोर कारवाई, मेडिकेअर संरक्षण कायद्यात तातडीने सुधारणा, सर्व रुग्णालयांत २४ बाय ७ सुरक्षा व्यवस्था, आरोग्य संस्थांमधील राजकीय हस्तक्षेपाला आळा आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवरील हिंसाचाराविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरणाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे.

## अण्णाभाऊंना भारतरत्न मिळाल्याने त्यांचा नव्हे, भारतरत्नाचा सन्मान वाढेल - विश्वासराव पाटील

पुणे (दै. संध्या)

कामगार सुरक्षा दल, झोपडपट्टी सुरक्षा दल आणि पथारी सुरक्षा दल यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मृती दिनानिमित्त पत्रकार भवन, पुणे येथे महाचर्चा व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. साहित्य, समाजकारण, चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, विचार आणि सामाजिक योगदानाचा जागर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मा. अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विश्वासराव पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार अरुण म्हात्रे, अभ्यासक डॉ. सुनील भंडगे, विचारवंत प्रा. अस्मा शेख, तसेच झोपडपट्टी सुरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट उपस्थित होते.



यावेळी दिग्दर्शक प्रवीण तरडे यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, पगडी आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच विशेष सन्मान म्हणून सामाजिक कार्यासाठी राज देशमुख, कवयित्री पंचवटी गोंडाळे यांचा सन्मान करण्यात आला.

प्रवीण तरडे म्हणाले, "अण्णा भाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते समाजातील वंचित, कष्टकरी आणि दुर्लक्षित घटकांचा आवाज होते. त्यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत मोठा सन्मान आहे. माझ्या कलाकृतींमधून समाजातील वास्तव मांडण्याचा मी कायम प्रयत्न केला असून, हा सन्मान पुढील वाटचालीसाठी अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे."

कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वासराव पाटील यांनी "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा गौरव करताना ज्येष्ठ साहित्यिक विश्वासराव पाटील यांनी सांगितले की, अण्णाभाऊंनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही मराठी साहित्याला समृद्ध करणारे अमूल्य योगदान दिले. त्यांच्या लेखणीतून श्रमिक, वंचित, दलित, स्त्रिया आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव प्रभावीपणे मांडले गेले. अण्णाभाऊ हे सह्याद्रीच्या मातीतले खरे निसर्गपुत्र असून त्यांच्या साहित्याचा झरा कधीही न आटणाऱ्या गोड पाण्याच्या विहिरीप्रमाणे आहे. त्यांनी अण्णाभाऊ साठे यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान देण्याची मागणी पुन्हा एकदा केली आणि प्रत्येक घरात अण्णाभाऊंची पुस्तके वाचली जावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

झोपडपट्टी सुरक्षा दलाचे अध्यक्ष भगवानराव वैराट यांनी आपल्या स्वागतपर मनोगतात सांगितले की, "अण्णा भाऊ साठे यांचे विचार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे. साहित्य, कला आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील. समाजातील कष्टकरी, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी काम करणे हीच अण्णा भाऊंना खरी आदरांजली ठरेल."

यावेळी "मराठी समीक्षकांना अण्णा भाऊंच्या साहित्याचा आवाका पकडता आला का?" या विषयावर आयोजित महाचर्चेत विविध मान्यवरांनी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा व्यापक सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भ उलगडून सांगितला. कार्यक्रमास साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काशिनाथ गायकवाड यांनी केले.

हरिभाऊ वाघमारे, रोहित वैराट,काशिनाथराव गायकवाड, महंमद शेख, दत्ता कांबळे, दत्ता कांबळे,सुरेखा भालेराव, वैशाली अवघडे, वंदना पवार, गणेश लांडगे, शामराव सोनवणे, नारायण कांबळे, श्रीनिवास आखाडे, प्रदीप पवार, आयुब शेख, नाना थोरातभाऊ कसबे, संजय भंडे आदी कार्यकर्त्यांनी विशेष श्रम घेतले.

## ॲट्रॉसिटी कायद्यातील दोषसिद्धी वाढविण्याचे निर्देश स्वागतार्ह - डॉ.हुलगेश चलवादी यांचे प्रतिपादन

पुणे (दै. संध्या)

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक (ॲट्रॉसिटी) कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविणे, जलदगती न्यायालयांची उभारणी, तपास प्रक्रियेत सुधारणा तसेच साक्षीदार संरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय दक्षता व सनियंत्रण समितीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशांचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी स्वागत केले आहे. मा.केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले साहेबांच्या नेतृत्वात आरपीआय पीडितांच्या मागे सदैव खंबीरपणे उभी असल्याचे देखील डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले.

ॲट्रॉसिटी कायद्याचा मूळ उद्देश अनुसूचित जाती व जमातीवरील अत्याचारांना आळा घालणे आणि पीडितांना तातडीने न्याय मिळवून देणे हा आहे. दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी सरकारी वकिलांचे प्रभावी कामकाज, तपास अधिकाऱ्यांचे विशेष प्रशिक्षण, साक्षीदार संरक्षण व्यवस्था आणि जलदगती न्यायालयांची उभारणी यांसारखे निर्णय न्यायव्यवस्था तसेच राज्य व्यवस्थेवरील सर्वसामान्यांचा विश्वास अधिक दृढ करतील, असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.


राज्यात ज्या जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे, तेथील परिस्थितीचा सखोल अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. अशा ठिकाणी सामाजिक न्याय बाधित होणार नाही आणि मूलभूत अधिकारांचे हनन होणार नाही, याची काळजी सरकारने घ्यावी. राज्याच्या प्रमुखाने दिलेले निर्देश सर्वसामान्यांसह पीडितांमध्ये विश्वास निर्माण करणारा असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस, प्रशासन, सरकारी वकील आणि संबंधित सर्व यंत्रणांमध्ये समन्वय वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ॲट्रॉसिटी कायद्याची कठोर आणि पारदर्शक अंमलबजावणी ही सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि वंचित घटकांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत आवश्यक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर घेतलेली भूमिका आणि दिलेले निर्देश हे पीडितांना वेळेत न्याय मिळवून देण्यासाठी सकारात्मक पाऊल असून, त्याची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षाही डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली.

## 'एक होतं माळीण'चा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच

पुणे (दै. संध्या)

काही वर्षांपूर्वी अतिवृष्टीमुळे भूस्खलन होऊन गाडल्या गेलेल्या माळीण गावाचा थरार आता मोठ्या पडद्यावर येत आहे. २४ जुलैला प्रदर्शित होणाऱ्या 'एक होतं माळीण' या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्तीवर आधारित मराठीतील हा पहिला मराठी चित्रपट असून तो नक्कीच वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे.

ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शनच्या संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे, तर रुपेश राणे, अरूण कोंजे, दत्तात्रय गायकर, राजु राणे हे सहनिर्माते आहेत. रॅन स्टुडिओज प्रोडक्शनचे नंदू मेहेर, रुपेश राणे, अरुण कोंजे, पंकज म्हात्रे ,श्रीराम भगत, अक्षय म्हात्रे व राजु राणे यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. चित्रपटाची संकल्पना, कथा, पटकथा राजु राणे यांची असून दत्तात्रय गायकर आणि राजु राणे यांनी चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शन केले आहे. प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे, अनिल नगरकर, प्रशांत तपस्वी, रामचंद्र धुमाळ, अक्षय म्हात्रे, दीपज्योती नाईक, अनुज ठाकरे अशा उत्तम कलावंतांच्या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. राजा फडतरे यांनी छायांकन, युवराज गोंगले यांनी गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन केलं असून अजय गोगावले, जावेद अली, आनंदी जोशी व हरिदास शिंदे यांनी चित्रपटातील गाणी गायली आहेत. कला नितेश नांदगावकर, व्हीएफएक्स रहमान अब्दुल्ला यांचे असून महेश भारंबे हे कार्यकारी निर्माते आहेत.



सिनेमाची कथा ही पूर्णतः सत्य घटनेवर आधारित असून चित्रपटाचे दिग्दर्शन राजू राणे, दत्तात्रय गायकर यांनी या सिनेमासाठी माळीण गावातील ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधून, त्यांच्याकडून योग्य माहिती घेऊन अचूक कथानक मांडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे. माळीण गावचा सेट हा विशेष उल्लेखनीय आहे. चित्रपटाची दृश्ये हादरवणारी, थक्क व्हायला लावणारी आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरमधून त्या घटनेची दाहकता जाणवते. मात्र, केवळ गाव इतिहासजमा होते या घटनेच्या पलीकडे नातेसंबंध, प्रेम, मानवी भावभावना यांची मनाला भावणारी गोष्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे.

## 'बनावट अभंग' आणि धर्मांतराचे षडयंत्र; हिंदु जनजागृती समिती आक्रमक

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता असलेल्या पवित्र पंढरीच्या वारीत आणि ससूनसारख्या सरकारी रुग्णालयांमध्ये विशिष्ट धर्मांध गटांकडून धर्मांतराचे आणि वारकऱ्यांचा बुद्धीभेद करण्याचे पद्धतशीर षड्यंत्र राबवले जात असल्याचा गंभीर आरोप हिंदु जनजागृती समितीने केला आहे. या गैरप्रकारांना त्वरित आळा घालून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी समितीचे समन्वयक श्री. पराग गोखले, सर्वश्री कृष्णाजी पाटील, सचिन घुले आणि अन्य कार्यकर्ते यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच पुणे विभागाच्या विभागीय आयुक्त सौ. शीतल तेली-उगले यांची भेट घेतली.



त्यांना या षड्यंत्राचे सविस्तर निवेदन दिले असून, यावर सकारात्मक प्रतिसाद देत विभागीय आयुक्तांनी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. रुग्णालयातील गरीब रुग्ण आणि निष्पाप वारकऱ्यांच्या हतबलतेचा गैरफायदा घेण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. जुलै महिन्यात ससून रुग्णालयाबाहेर सुनील आणि प्रतिभा वर्गीस या ख्रिस्ती दाम्पत्याला कर्करोग केवळ येशूच्या प्रार्थनेने बरा होईल, अशा अंधश्रद्धा पसरवून धर्मांतराचा प्रयत्न करताना रंगेहात पकडण्यात आले होते. दुसरीकडे, वारीच्या पवित्र मार्गावर वारकऱ्यांचा बुद्धीभेद करण्यासाठी बायबलमधील तत्त्वज्ञान संतांच्या नावे खपवून 'बनावट अभंग' आणि 'कृपा संगम'सारख्या हस्तपुस्तिका वाटल्या जात आहेत. एवढेच नव्हे तर, अहिल्यानगरसारख्या भागात ‘मतमाऊली वारी’ आणि ‘येशूनाम सप्ताह’ आयोजित करून, दिंडी आणि टाळ-मृदंगाचा वापर करत मूळ वारकरी परंपरेची हुबेहूब नक्कल करत भाविकांची मोठी फसवणूक केली जात असल्याकडे समितीने प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

या धर्मांतराच्या प्रयत्नांसोबतच पालखी मार्गांवर ‘अल्लाविना कुणी देव नाही’ असे प्रक्षोभक उर्दू फलक लावून जाणीवपूर्वक हिंदूंच्या भावना दुखावून सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न होत आहे. डिजिटल माध्यमांतूनही संतांच्या नावे बनावट अभंगांचे रिल्स प्रसारित करून सायबर षड्यंत्र राबवले जात आहे. सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा (अंनिस) कार्यकर्ता प्रशांत कांबळे ऊर्फ लॅपटॉप कांबळे याला नक्षलवाद्यांशी थेट संबंध असल्याच्या आरोपावरून पुणे एटीएसने मागील वर्षी अटक केली आहे. अशा देशविघातक विचारसरणीचे लोक पुरोगामित्वाचा बुरखा पांघरून वारीत घुसतात आणि वारकऱ्यांची दिशाभूल करतात, हे राष्ट्रीय सुरक्षेसाठी अत्यंत धोकादायक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या सर्व गंभीर प्रकारांना आळा घालण्यासाठी उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अत्यंत कठोर 'धर्मांतरविरोधी कायदा' तातडीने लागू करावा, अशी प्रमुख मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे. तसेच संशयास्पद साहित्य वाटणाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २९९, ३०२ आणि ३१८ नुसार तात्काळ गुन्हे दाखल करावेत, रुग्णालयांबाहेर साध्या वेशातील पोलीस तैनात करावेत आणि देशविघातक कृत्यांत आढळलेल्या संस्थांच्या कार्यकर्त्यांना वारीत प्रवेश नाकारावा, असे श्री. घनवट यांनी सांगितले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## बारामतीत साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : दिनांक १८ जुलै २०२६ रोजी विश्वविख्यात साहीत्यीक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त साठेनगरमधील अण्णाभाऊ साठे तरुण मंडळ व विविध संघटनाच्या वतीने अभिवादन करण्यात आले यावेळी नगराध्यक्ष सचिनशेठ सातव,राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष किरण इंगळे, बारामती वकील संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अँड. सचिन वाघ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी नगरसेवक राजेंद्र नाना सोनवणे,गणेश काका जोजारे,अमोल कावळे, नगरसेविका शर्मिलाताई ढवाण पाटील,मनिषा बनकर,ॲड.पी.टी गांधी,पत्रकार तानाजी पाथरकर,सामाजिक कार्यकर्ते,ओंकार देशमुख,संदिप बनकर,टी.व्ही मोरे,दिलीप ढवाण पाटील,शुभम अहीवळे,प्रतिक ढवाण पाटील,योगेश महाडीक,गजानन गायकवाड,राजेश कांबळे,महावीर गायकवाड, विशाल खंडाळे,संजय वाघमारे उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे आयोजन मा.उपनगराध्यक्ष विजयराव खरात नगरसेविका प्रतिभा खरात,आण्णाभाऊ साठे तरुण मंडळ,लहुजी प्रतिष्ठान पॉईंट, लहुजी शक्ती सेना,अण्णाभाऊ साठे मित्र मंडळ,जय लहुजी फ्रेंड सर्कल,क्रांतीसेना प्रतिष्ठान, यांच्या वतीने करण्यात आले होते.



## रजनी दारवटकर यांचे निधन

पुणे (दैनिक संध्या) : जनता वसाहत येथील रहिवासी रजनी नंदकुमार दारवटकर (वय ७६ वर्ष) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा सागर दारवटकर, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दारवटकर या भारतीय जैन संघटना (बीजेएस) संस्थेतील वरिष्ठ व्यवस्थापक प्रशांत पितालिया यांच्या सासू होत्या.

## समाज परिवर्तनाचा संघर्षशील आवाज हरपला

पुणे (दैनिक संध्या) : ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी नेते आणि 'युवक क्रांती दल' (युक्रांद)चे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्यभर झटणारा एक अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि संघर्षशील आवाज आज हरपला आहे. वैद्यकीय क्षेत्रात उज्ज्वल कारकीर्द घडविण्याची संधी असतानाही त्यांनी समाजसेवेचा मार्ग स्वीकारला. सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये, सत्याग्रह आणि गांधीवादी विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. युवक क्रांती दलाच्या माध्यमातून त्यांनी असंख्य तरुणांना सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सहभागी करून घेतले. आणीबाणीच्या काळातील त्यांचा लढा, सामाजिक विषमता व अन्यायाविरोधातील त्यांची ठाम भूमिका, तसेच कोयना भूकंपग्रस्त आणि दुष्काळग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी केलेले त्यांचे विधायक कार्य समाजासाठी कायम प्रेरणादायी राहील. डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो. त्यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य अनुयायांना हे दुःख सहन करण्याचे बळ लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. या दुःखद प्रसंगी आम्ही सर्वजण त्यांच्या परिवाराच्या आणि सहकाऱ्यांच्या दुःखात सहभागी आहोत.



## जेजुरीत दुर्दैवी घटना : सेफ्टी टँकमध्ये बुडून दीड वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

जेजुरी (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथील दवणेमळा परिसरात सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी घटना घडली. दीड वर्षीय चिमुकला सकाळी घरातून अचानक बेपत्ता झाला. कुटुंबीयांनी आणि स्थानिक नागरिकांनी शोध घेतल्यानंतर घराजवळील सेफ्टी टँकमध्ये तो आढळून आला.चिमुकल्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली . सदर मृत दीड वर्षाच्या चिमुकल्यांचे नाव शिव अविनाश हितापूर असे असून मयत चिमुकल्याचे कुटुंब मूळचे हरसगुडी, ता. चिंचोली, जि. कलबुर्गी (कर्नाटक) येथील असून त्याचे कुटुंबीय मोल मजुरीसाठी येथे आले असून जेजुरी पोलीस पुढील तपास करत आहेत. घर परिसरातील सेफ्टी टँक, विहिरी, पाण्याचे खड्डे व इतर धोकादायक ठिकाणे सुरक्षित झाकून ठेवावीत. लहान मुलांवर क्षणभरही दुर्लक्ष होणार नाही, याची प्रत्येक पालकांनी विशेष काळजी घ्यावी.असे आवाहन जेजुरी पोलिसांनी केले.

## मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवशी जाहिरात, होर्डिंग, उत्सव नको!

मुंबई (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांचा 22 जुलै रोजी वाढदिवस आहे. यानिमित्ताने पक्षाचे कोणतेही नेते आणि कार्यकर्ते होर्डिंग, बॅनर लावणार नाहीत आणि वृत्तपत्रातून/ टीव्ही माध्यमातून जाहिराती प्रसिद्ध करणार नाहीत, असे आवाहन भारतीय जनता पक्षातर्फे करण्यात आल्याचे भाजपाचे प्रदेश कार्यालय प्रभारी रवी अनासपुरे यांनी कळविले आहे. होर्डिंग, बॅनर, जाहिराती असे कुणी केल्यास त्याची पक्षातर्फे शिस्तभंगाची गंभीर दखल घेतली जाईल. त्यामुळे या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. ज्या कुणाला योगदान द्यायचे आहे, त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीत योगदान द्यावे, असे आवाहन सुद्धा पक्षातर्फे करण्यात येत आहे.

## सिद्धेश्वर सोसायटीच्या अध्यक्षपदी मुगुट खेसे यांची निवड



पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव येथील श्री सिद्धेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित नायगाव या सोसायटीची अध्यक्ष पदाची निवडणूक नुकतीच संपन्न झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आमरीन बागवान यांनी काम पाहिले. त्यांना सचिव सोमनाथ चव्हाण यांनी सहकार्य केले.यावेळी सोसायटीच्या अध्यक्षपदी मुगुट माणिक खेसे यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली.

### भैरव क्रांती सेनेच्या वतीने राज्यस्तरीय कला महोत्सव २०२५–२६ अंतर्गत

# कलाकार सन्मानपत्र वितरण मोहिमेस पुणे मुख्यालयातून प्रारंभ

पुणे (दै. संध्या) :

महाराष्ट्रातील पारंपरिक लोककला, लोकसंस्कृती आणि लोककलावंतांचा गौरव करण्याच्या उद्देशाने भैरव क्रांती सेनेच्या कलाकार विभागाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय कला महोत्सव २०२५–२६ अंतर्गत कलाकार सन्मानपत्र वितरण मोहिमेस आज भैरव क्रांती सेनेचे मुख्यालय, पुणे येथून अधिकृतपणे प्रारंभ करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या निवड समितीने कलाकारांची निवड, त्यांच्या कला कार्याची पडताळणी आणि पात्र कलाकारांना सन्मानपत्र वितरणाची प्रक्रिया हाती घेतली आहे.



भैरव क्रांती सेना ही महाराष्ट्रातील लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी सातत्याने कार्यरत असून, राज्यभरातील पारंपरिक लोककलावंतांना योग्य व्यासपीठ व सन्मान मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील तसेच उपेक्षित पारंपरिक कलाकारांच्या कलेची दखल घेऊन त्यांना समाजासमोर आणणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे आणि पुढील पिढीला लोककलेचे महत्त्व पटवून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

कलाकार सन्मानपत्र वितरण मोहिमेची अधिकृत सुरुवात भैरव क्रांती सेनेच्या मुख्यालय, पुणे येथून करण्यात आली असून, आगामी काळात ही मोहीम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील पारंपरिक लोककला जपणाऱ्या पात्र कलाकारांचा शोध घेऊन त्यांना सन्मानित करण्यासाठी निवड समिती कार्यरत राहणार आहे. यावेळी भैरव क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. विजय जाधव यांनी सांगितले की, "लोककला ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा पाया आहे. या कलेचे जतन करणाऱ्या कलाकारांचा सन्मान करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. भैरव क्रांती सेना कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता लोककलेसाठी आयुष्य वेचणाऱ्या सर्व कलाकारांचा सन्मान करण्यासाठी कटिबद्ध आहे. ही मोहीम राज्यव्यापी स्वरूपात राबवून अधिकाधिक लोककलावंतांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न राहील." तसेच राज्यातील सर्व पारंपरिक लोककलावंतांनी आपल्या कलेचा परिचय, कार्याची माहिती व आवश्यक कागदपत्रांसह भैरव क्रांती सेनेशी संपर्क साधावा, जेणेकरून पात्र कलाकारांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देता येईल, असे आवाहनही करण्यात आले.


यापूर्वी दि. ३० जून २०२६ रोजी पत्रकार भवन, गाजिया चौक, नवी पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आलेला राज्यस्तरीय कला महोत्सव २०२५–२६ मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला होता. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे ओबीसी नेते लक्ष्मणराव हाके, जामखेडचे नगरसेवक ॲड. अरुण आबा जाधव, सौ. उमाताई जाधव यांच्यासह सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, पत्रकारिता आणि कला क्षेत्रातील असंख्य मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पारंपरिक लोककलांचे संवर्धन आणि कलाकारांचा सन्मान करणाऱ्या भैरव क्रांती सेनेच्या उपक्रमाचे कौतुक केले.

या कला महोत्सवात वासुदेव सांस्कृतिक कलाकार श्री. रमाकांत निवृत्ती सुकते (पुणे), श्री. गोविंदराव अटक यांच्यासह अनेक पारंपरिक लोककलावंतांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या लोककला जतन व संवर्धनातील योगदानाची दखल घेत त्यांना सन्मानित करण्यात आले. आता या महोत्सवाच्या अनुषंगाने राज्यातील इतर पात्र कलाकारांनाही निवड समितीच्या शिफारशीनुसार टप्प्याटप्प्याने सन्मानपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

## टाटा प्ले बिंजने व्हर्टिगो टीव्ही आणि भक्तीफ्लिक्ससह आपल्या कंटेन्ट ऑफरिंगचा विस्तार केला

नवी दिल्ली (दै. संध्या) :

टाटा प्ले बिंजने व्हर्टिगो टीव्ही आणि भक्तीफ्लिक्सचा समावेश करून आपल्या कंटेन्ट ऑफरिंगचा विस्तार केला आहे, ज्यामुळे वन टेक मीडियासोबत त्यांचा सहयोग अधिक दृढ झाला आहे. या विस्तारित सहयोगाचा भाग म्हणून, व्हर्टिगो टीव्ही आता टाटा प्ले बिंज शॉट्समध्ये सामील झाला आहे, जे विविध शैलींमधील छोट्या आकाराच्या कथांसाठी प्लॅटफॉर्मचे समर्पित ठिकाण आहे. तर भक्तीफ्लिक्स हा आध्यात्मिक प्लॅटफॉर्म आहे, जिथे भक्ती आणि मनोरंजन एकत्र येते, जे टाटा प्ले बिंजच्या भक्तीमय ऑफरिंगचा




विस्तार करते. एकत्रितपणे, हे दोन्ही प्लॅटफॉर्म्स ग्राहकांना एकाच सबस्क्रिप्शन आणि युनिफाइड व्युईंग अनुभवाद्वारे अधिक पर्याय उपलब्ध करून देतात. हा विस्तारित सहयोग प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडी पूर्ण करणाऱ्या विशेष स्ट्रीमिंग सेवांना एकत्र आणून कंटेन्ट शोधणे सोपे करण्यावर टाटा प्ले बिंजने दिलेल्या लक्ष्यावर आधारित आहे.

## प्रेयसीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी धोकेबाज प्रियकरावर गुन्हा दाखल

**लग्नास नकार दिल्याचे कारण; खालुंब्रे येथील धक्कादायक प्रकार**

चाकण (दै. संध्या) :

लग्नास नकार दिल्याने आलेल्या नैराश्यातून प्रेयसीने राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने छताच्या अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी तिच्या प्रियकरावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड तालुक्यातील खालुंब्रे येथील तुळवे वस्तीतील एका भाड्याच्या खोलीत हा प्रकार घडला.

मोनिका रामदास पवार (वय - २२, रा. चंद्रकांत तुळवे यांची खोली, तुळवे वस्ती, खालुंब्रे, ता. खेड, मूळ रा. खांडके, ता.जि. अहिल्यानगर,) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. तिची आई रोहिणी रामदास पवार (वय - ४०, रा. खालुंब्रे) यांनी याप्रकरणी उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. रोहिणी यांनी महाळुंगे पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून, महाळुंगे पोलिसांनी साहिल शंकर बोत्रे (वय - २३, रा.येलवाडी, ता. खेड) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

अधिक माहिती अशी की, मोनिका ही तिच्या आई-वडिलांसमवेत खालुंब्रे येथे तुळवे यांच्या भाड्याच्या खोलीत गेल्या वीस वर्षांपासून राहत होते. दरम्यानच्या काळात मोनिका व साहिल यांच्यामध्ये सुत जुळून प्रेमसंबंध निर्माण झाले. साहिल याने मोनिका हिला लग्नाचे आमिष दाखवून लग्न न करता तो दुसऱ्या एका मुलीबरोबर चॅटिंग करीत असल्याचे तिला समजले.

मोनिका हिने याबाबत साहिल याला विचारणा केली असता त्याने सांगितले की ती माझी मैत्रीण आहे. म्हणून मी तिच्याशी चॅटिंग करत आहे. मी तुझ्याशी लग्न करणार नाही, आपल्या दोघांच्या लग्नाला माझ्या घरच्यांचा तीव्र विरोध आहे. यातून आलेल्या नैराश्यातून मोनिका हिने कोणाला कसलाच थांगपत्ता लागू न देता



राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने छताच्या अँगलला गळफास लावून घेऊन आत्महत्या केली.

मोनिका पवार हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी तिचा प्रियकर साहिल बोत्रे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# हरिनामाच्या गजराने दुमदुमली काळदरी

जेजुरी (दै. संध्या) :

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री. केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी या विद्यालयाचा काळदरी गावात पारंपरिक दिंडी सोहळा उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

भेटीलागी जीवा...लागलीसे आसं || विठ्ठल विठ्ठल जयहरी विठ्ठल...जय जय राम कृष्ण हरी... दिंडी चालली,चालली पंढरीला अशा अखंड नामघोषात बाल वारकरी दिंडी सोहळ्यात सहभागी झाले. यामध्ये विठ्ठल रुक्मिणी, संत तुकाराम, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर व संत मुक्ताबाई यांचेसह विविध संतांच्या वेशभूषा करुन या दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी अधिक रंगत आणली.



कार्यक्रमाची सुरुवात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंग व हरिनामाच्या घोषात आकर्षक दिंडी काढली. दिंडीत संतांच्या विचारांचे फलक, भगवे ध्वज, तुळशी वृंदावन व पालखी यांमुळे परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

यावेळी विद्यार्थ्यांना संत परंपरेचे महत्त्व, समाजात बंधुभाव, नैतिक मूल्ये, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला. प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा आणि संतवाङ्मयाचे महत्त्व समजावून सांगितले.

या भक्तिमय दिंडी सोहळ्याचे काळदरी गावात घरोघरी स्वागत करण्यात आले यावेळी पालखीतील विठ्ठल रुक्मिणी मुर्तीचे आणि विठ्ठल रुक्मिणी वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे औक्षण करुन स्वागत केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे प्राध्यापक संतोष नवले, सुनिल घोडके, संजय भिंताडे, पंडित चेंडके, सौ सुनंदा टकले, सौ कविता शेलार, पुरंदर तालुका शिक्षकेतर संघटनेचे मा अध्यक्ष पांडुरंग जाधव, ग्रामपंचायत सदस्य अशोक भगत, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी काळदरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील आणि अंगणवाडी येथील शिक्षिका, अंगणवाडी सेविका व विद्यार्थी यांचेसह अनेक पालक व ग्रामस्थ या सोहळ्यात सहभागी झाले होते. यामध्ये ह.भ.प. प्रकाश कारकर, ह.भ.प. संतोष जगताप, ह.भ.प.शरद कारकर, दिपक यादव, संपत घोडके, सौ मोहिनी कारकर, सौ प्रमिला घोडके, सौ कुंभार, सौ शैला जाधव, सौ रेखा कारकर, आदी पालक उपस्थित होते.

पालक व ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. संतांच्या विचारांचा वारसा जपत विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त व सामाजिक जाणीव निर्माण करणारा हा उपक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. विद्यालयाचे स्थानिक सल्लागार संपत जाधव यांनी सर्व बाल वारकऱ्यांना बिस्कीट पुडे आणि चॉकलेट वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना कायमस्वरूपी जागा द्या

मुंबई (दै. संध्या) :

■ अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना उत्सवाबरोबरच वर्षभर राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

महासंघाच्या निवेदनानुसार, मुंबईत सुमारे १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे कार्यरत असून ती केवळ गणेशोत्सवापुरती मर्यादित नसून वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवितात. अनेक मंडळांकडून बालवाड्या, व्यायामशाळा, रक्तपेढी, मेडिकल सेंटर, फिजिओथेरपी केंद्र, वाचनालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी उपक्रम तसेच ॲम्ब्युलन्स सेवा अशा लोकाभिमुख सेवा कमी दरात उपलब्ध करून दिल्या जातात.

निवेदनात म्हटले आहे की, मुंबईत सुरू असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांमुळे विशेषतः म्हाडा वसाहतींमधील अनेक मंडळांच्या जागा धोक्यात आल्या आहेत. विकासकांकडून जागा खाली करण्यासाठी दबाव आणला जात असल्याने भविष्यात गणेशोत्सव साजरा करणे आणि वर्षभराचे सामाजिक उपक्रम राबविणे कठीण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

यामुळे लोकप्रतिनिधी निधीतून उभारण्यात आलेले सभागृह, मंडप किंवा शेड संबंधित मंडळांच्या नावावर करून द्यावेत अथवा पुनर्विकासाच्या ठिकाणी मंडळांना योग्य मोबदल्यात कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी महासंघाची प्रमुख मागणी आहे. त्यामुळे भविष्यातही गणेशोत्सवाची परंपरा आणि मंडळांचे सामाजिक कार्य अखंडित सुरू राहील, असे महासंघाने नमूद केले आहे. हे निवेदन महासंघाचे प्रमुख कार्यवाह सुरेश सरनोबत, कार्याध्यक्ष सुहास अडिवरेकर आणि अध्यक्ष जयेंद्र साळगावकर यांच्या स्वाक्षरीने मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आले आहे.

# झिथारा.एआयची पाल्मोनाससोबत धोरणात्मक भागीदारी

हैदराबाद (दै. संध्या) :

ऑफलाइन किरकोळ व्यवसायांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ग्राहक संवाद आणि व्यवस्थापन सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या झिथारा.एआयने ज्वेलरी क्षेत्रातील पाल्मोनाससोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीच्या माध्यमातून ग्राहकांना अधिक वैयक्तिक आणि प्रभावी खरेदी अनुभव देण्याबरोबरच ग्राहकांशी दीर्घकालीन संबंध निर्माण करणे आणि व्यवसायाच्या महसुलात वाढ करणे हा प्रमुख उद्देश आहे.

या भागीदारीअंतर्गत पाल्मोनासकडून झिथारा.एआयच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ग्राहक संबंध व्यवस्थापन प्रणालीचा वापर केला जाणार आहे. विविध माध्यमांतून उपलब्ध होणारी ग्राहकांची माहिती एकत्रित करून त्यांच्या संवादाचा एकाच ठिकाणी आढावा घेणे या प्रणालीमुळे शक्य होणार आहे. तसेच ग्राहकांचे वर्गीकरण, स्वयंचलित संपर्क आणि त्यांच्या आवडी व गरजांनुसार वैयक्तिक संदेश पाठवण्याची सुविधाही उपलब्ध होणार आहे.

ऑनलाइन चौकशी करणारे ग्राहक आणि प्रत्यक्ष दुकानांना भेट देणारे ग्राहक यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यासाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. ग्राहकांच्या आवडीनिवडींचे विश्लेषण करून योग्य वेळी त्यांच्याशी संपर्क साधणे, प्रभावी विपणन मोहिमा राबवणे आणि ग्राहकांना पुन्हा खरेदीसाठी प्रोत्साहित करणे यामुळे शक्य होणार आहे. परिणामी ग्राहक दीर्घकाळ ब्रँडशी जोडले जाण्यासह विक्री आणि उत्पन्नवाढीलाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

डेमिफाइन फॅशन प्रा. लि.चे मुख्य विपणन अधिकारी हितेश मगू यांनी सांगितले की, पाल्मोनाससाठी ग्राहकांना उत्तम आणि संस्मरणीय अनुभव देण्याबरोबरच किरकोळ विक्रीचे जाळे वाढवणे ही प्राथमिकता आहे. ग्राहकांचा डिजिटल माध्यमातून सुरू होणारा प्रवास प्रत्यक्ष दुकानापर्यंत नेणे आणि त्यांच्याशी दीर्घकालीन संबंध निर्माण करण्यासाठी झिथारा.एआयचे तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

झिथारा.एआयचे सह-संस्थापक वरुण कश्यप यांनी पाल्मोनाससोबतच्या भागीदारीबद्दल आनंद व्यक्त केला. ग्राहकांच्या माहितीचे प्रभावी व्यवस्थापन आणि योग्य वापर करून ब्रँडना ग्राहकांशी सातत्यपूर्ण आणि वैयक्तिक संवाद साधण्यास मदत करणे हे या मंचाचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले.

झिथारा.एआयच्या सह-संस्थापक श्रीदेवी रेड्डी यांनी सांगितले की, माहितीच्या आधारे अधिक प्रभावी व्यावसायिक निर्णय घेण्यासाठी ऑफलाइन किरकोळ व्यवसायांना सक्षम करणे हे कंपनीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पाल्मोनासला ग्राहकांच्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास आणि मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक अनुभव उपलब्ध करून देण्यासाठी ही भागीदारी उपयुक्त ठरेल.

किरकोळ विक्री क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर लक्षात घेता ही भागीदारी महत्त्वाची मानली जात आहे. झिथारा.एआयच्या तंत्रज्ञानाच्या मदतीने पाल्मोनासला अधिक सक्षम, सुव्यवस्थित आणि विस्तारक्षम ग्राहक व्यवस्थापन व्यवस्था उभारता येणार असून, भविष्यातील व्यवसायवाढीसाठीही त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### मनपाच्या सर्व रुग्णालयात बील भरण्यासाठी ऑनलाइन सुविधा द्या - रवींद्र ओव्हाळ

पिंपरी (दैनिक संध्या) : स्मार्ट सिटी, मेट्रो सिटी, इ गव्हर्नन्स प्रशासन असा बडेजाव मिरवणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाला अद्यापही शहरातील यशवंतराव चव्हाण रुग्णालयासह इतर रुग्णालयात बिल भरण्याची ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यास अपयश आले आहे.



रुग्ण व नातेवाईकांच्या सुविधेसाठी वायसीएम रुग्णालय सह सर्व रुग्णालय व ओपीडी मध्ये बिल भरण्याची ऑनलाइन सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे झोपडपट्टी सेल शहर अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि महापौर रवी लांडगे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दोन दिवसांपूर्वी वायसीएम रुग्णालयात केस पेपर काढताना एका ज्येष्ठ नागरिकाचा आणि रुग्णालयीन कर्मचाऱ्याचा सुट्ट्या पैशांवरून वाद झाला. या व्हिडिओमध्ये संबंधित कर्मचाऱ्याचा उद्धटपणा दिसत आहे. असे प्रकार बहुतांशी सर्वच रुग्णालयात वारंवार घडत आहेत. रुग्णालयात केस पेपर काढणे आणि बिल भरणे यासाठी बहुतांश ठिकाणी ठेकेदारामार्फत कर्मचारी नेमण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यावर रुग्णालयीन प्रशासनाचे व कोणाचेच नियंत्रण नाही, त्यामुळे ते असे उद्धटपणे नागरिकांची वाद घालत असतात. पुणे व पिंपरी चिंचवड शहरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था देणाऱ्या पीएमपी मध्ये आणि मेट्रोमध्ये देखील ऑनलाईन तिकीट काढता येते. मिळकत कर देखील ऑनलाईन भरता येतो. केंद्र सरकार आणि राज्य सरकार च्या अनेक आस्थापना देखील अनेक विभागांचे कर ऑनलाईन स्वीकारत आहे. तर पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाला रुग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवेमध्ये ऑनलाइन बिल भरण्याची सेवा का उपलब्ध करून दिली जात नाही असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना आहे. ही सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे झोपडपट्टी सेल शहर अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ यांनी दिला आहे.

### डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी वैद्यकीय सेवा बंद

पिंपरी (दैनिक संध्या) : डोंबिवली येथील डॉक्टर आणि नर्सेसवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोशिएशन पिंपरी चिंचवड भोसरी शाखेच्या वतीने (दि. २० रोजी) एकदिवसीय राज्यव्यापी संप पुकारण्यात आला. अशी माहिती अध्यक्ष डॉ. सुधीर भालेराव, सचिव डॉ. विकास मंडलेचा,उपाध्यक्ष डॉ. मिलिंद सोनावणे, डॉ. अनिरुद्ध टोणगावकर, डॉ. सुहास लुंकड, डॉ. मंदार डोईफोडे यांनी दिली आहे. दि २० रोजी सकाळी ६ वाजे पासून ते दि.२१ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत दिवसभरात बाह्य रुग्ण सेवा बंद राहिल. मात्र ज्या तातडीची वैद्यकीय सेवा, प्रसूती वैद्यकीय सेवा सुरू राहतील. असे ही नमूद केले आहे.डोंबिवली येथील एका नगरसेवकाने केलेल्या डॉक्टरांवरील हल्ला, डॉक्टर हा केवळ व्यवसाय करणारा मनुष्य नसतो; तो आशेचा दीपस्तंभ असतो. मृत्यूच्या दाराशी उभ्या असलेल्या रुग्णाला जीवनाची नवी संधी देण्याचा प्रयत्न करणारा तो एक कर्मयोगी असतो. परंतु आज दुर्दैवाने या कर्मयोग्याच्याच हातावर प्रहार होत आहेत. डॉक्टरांवरील हल्ले ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नाही, तर ती समाजाच्या विवेकाला झालेली गंभीर जखम आहे. रुग्णालय हे युद्धभूमी नसते; ते करुणेचे मंदिर असते. डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी हे सैनिक नसले तरी ते जीवनरक्षक योद्धे असतात. दिवस-रात्र, सण-उत्सव, स्वतःचे सुख-दुःख बाजूला ठेवून ते रुग्णसेवेत मग्न असतात. तरीही एखादा रुग्ण दगावला किंवा उपचार अपेक्षेप्रमाणे झाले नाहीत की संतप्त नातेवाईक डॉक्टरांवर हात उगारतात. ही संतप्त भावना समजण्यासारखी असली, तरी हिंसा कधीच न्याय्य ठरू शकत नाही. वैद्यकशास्त्र हे गणित नाही तर येथे व्यवसायापेक्षा माणुसकी जास्त महत्वाची असतें. डॉक्टर्स, सिस्टर यांच्यावर असे राजकीय गुंडाकडून होणारे भ्याड हल्ले थांबले नाहीत तर पुढच्या काळात डॉक्टर्स होण्यासाठी कोणी धजावणार नाही परिणामी वैद्यकीय खर्च अजुन महागडा होईल आणि यात सामान्य माणूस भरडला जाईल. तेंव्हा आताच या हल्लेखोरावर कडक कायदेशीर कारवाई अपेक्षित आहे.

### इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी छत्रीवर साकारले कलेचे सप्त-तरंग..!

मोशी (दैनिक संध्या) : इंद्रधनुष्यातील सातही रंगासोबत आणखी असंख्य रंगांच्या छटा जणू धारित्रीवर उतरल्या आहेत आणि चिमुकली बोटं आणि त्यामध्ये असलेले ब्रश त्या रंगांचा आनंद शुभ्र पांढऱ्या छत्रीवर मनमुराद घेत आहेत असं अत्यंत विलोभनीय चित्र आज चिखली-मोशी मध्ये दिसलं. निमित्त होतं ते अंब्रेला पेंटिंगची कार्यशाळा. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कलागुणांना वाव मिळावा. विद्यार्थ्यांच्या सुपीक कल्पनेतून नवाविष्कारांची निर्मिती व्हावी याच उद्देशाने इनोव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूल विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असते. याचाच एक भाग म्हणून "माझी छत्री – माझी चित्रकला" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे संचालिक डॉ. संजय सिंग यांनी सांगितले. सुप्रसिद्ध कॅलिग्राफी कलाकार पद्मश्री पुरस्कार विजेते श्री अच्युत रामचंद्र पालव यांनी विविध रंगछटा कशा साकारतात, याचे मार्गदर्शन देऊन कला आपल्याला शून्यातून शांतीकडे कशी घेऊन जाते याचे महत्त्व सांगितले. श्री. पालव यांनी स्वतः अनेक प्रात्यक्षिके दाखवत, ब्रशचे वेगवान फटकारे मारत, उपस्थित्यांची तर मनं जिंकली. पण सोबत पावसाची गाणी, हातात ब्रश पाहिजे तस रंगवण्याची मुक्त परवानगी, यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. विद्यार्थ्यांनी साध्या छत्र्यांना रंगीबेरंगी रंग, आकर्षक नक्षी आणि कल्पक रचना वापरून सुंदर कलाकृतींमध्ये रूपांतरित केले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसोबत संस्थापक संचालिका श्रीमती कमला बिष्ट, संस्थापक संचालक डॉ. संजय सिंग, कु. शोभना सिंग तसेच शाळेच्या प्राचार्या, शिक्षक यांनी देखील छत्रींवर चित्रकला साकारून सक्रिय सहभाग नोंदविला. देवदत्त फोटोग्राफी स्कूलचे संचालक श्री देवदत्त कशाळीकर, प्रचिती इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष श्री प्रशांत पाटील यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. श्रीमती कमला बिष्ट यांनी, कला आपल्याला स्वतःला शोधण्याची आणि त्याच वेळी स्वतःला विसरण्याची संधी देते. या थॉमस मर्टन यांच्या उक्तीची आठवण करून दिली. स्वतः रंगवलेली अशीच सुंदर छत्री घेऊन निसर्ग आणि कलाविष्कार याचा अनोखा संगम करत, आपल्या कलाकृतीचा आनंद, विद्यार्थ्यांनी स्वतः रंगवलेल्या सुंदर छत्र्या घेऊन पावसात नृत्य करून उपक्रमाची सांगता झाली.




# नारायण सुर्वे हे कवितेतील सूर्य - डॉ.श्रीपाल सबनीस

पिंपरी (दै. संध्या)



'कविवर्य नारायण सुर्वे हे कवितेतील सूर्य होते. त्यांची कविता मानवमुक्तीची कविता आहे!' असे गौरवोद्गार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी सायन्स पार्क सभागृह, चिंचवड येथे शुक्रवार, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी काढले. पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिका प्रा. सुरेखा कटारिया यांना पद्मश्री नारायण सुर्वे जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविताना डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. पिंपरी - चिंचवड महापालिका विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर अध्यक्षस्थानी होते; तसेच पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे, स्वानंद महिला संस्थेच्या अध्यक्षा शोभा बंब, राष्ट्रपती पोलीस पदक प्राप्त कवी सीताराम नरके यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्योजक आणि कृषिभूषण सुदाम भोरे यांच्या सहधर्मचारिणी वर्षा भोरे (मास्तरांची सावली कृष्णाबाई नारायण सुर्वे सन्मान), सामाजिक कार्यकर्ते रोहित खर्गे (पद्मश्री नारायण सुर्वे भला माणूस पुरस्कार), ज्येष्ठ साहित्यिका पल्लवी बनसोडे परुळेकर (पद्मश्री नारायण सुर्वे विचारसाधना पुरस्कार), कवी राजू जाधव (पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी सन्मान) यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

डॉ. श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, 'नारायण सुर्वे हे संस्कृतीच्या शहाणपणाला मौनात पाठविणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या हयातीनंतरही सांस्कृतिक शहाणपण आले आहे की नाही, हा प्रश्न पडतो. जन्मापासून अन्याय सोसूनही त्यांच्या कवितेत कडवटपणा आला नाही; याउलट त्यांनी मातृत्वाचा गौरवच केला आहे!' सत्काराला उत्तर देताना प्रा. सुरेखा कटारिया यांनी, 'पारंपरिक संस्कारांच्या कुटुंबात वावरताना सहजीवनाचा अनुभव घेतला. विवाहानंतर स्वत: उच्च शिक्षण घेतले आणि मुलांनाही उच्चशिक्षित केले. जगण्यातला स्वानंद घेत असतानाच त्यात समाजालाही सामावून घेतले!' अशी भावना व्यक्त केली. वर्षा भोरे यांनी, 'मोठ्या एकत्र कुटुंबात स्वतःला उन्हात झाड बनून उभे राहावे लागते, अशी शिकवण आईवडिलांनी दिली!' असे नमूद केले; तर रोहित खर्गे यांनी, 'आजपर्यंत जीवनात नि:स्वार्थी मित्रांमुळे स्वाभिमानाने जगलो. त्यामुळे हा पुरस्कार मित्रांचाच आहे!' अशी कृतज्ञता व्यक्त केली. पल्लवी बनसोडे यांनी, 'प्रामाणिकपणे केलेल्या कामाची दखल घेतली जाते!' याची ग्वाही दिली; तर राजू जाधव यांनी, 'कोणत्याही कामाची कधी लाज बाळगली नाही!' अशी प्रांजळ कबुली दिली. भाऊसाहेब भोईर यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'बुद्धीने श्रीमंत होता येते; पण श्रीमंतीने बुद्धिवंत होता येत नाही. नारायण सुर्वे मला प्रेमाने 'पोट्ट्या' म्हणत, ही श्रीमंती कशातही मोजता येत नाही!' असे मत मांडले.

बाजीराव सातपुते यांनी प्रास्ताविकातून कविवर्य सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांतील हे दहावे पुष्प आहे, अशी माहिती दिली. नारायण सुर्वे काव्यजागर कविसंमेलनात राजेंद्र वाघ, जयश्री श्रीखंडे, प्रभाकर वाघोले, स्वाती भोसले, सीमा गांधी यांनी नारायण सुर्वे यांच्या वैविध्यपूर्ण कवितांचे प्रभावी सादरीकरण करून दाद मिळवली. संगीता झिंजुरके यांनी कविसंमेलनाचे निवेदन केले; तर पुरुषोत्तम सदाफुले यांनी पुरस्कारार्थींशी सुसंवाद साधून हितगुज केले. कार्यक्रमादरम्यान शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक शिक्षिकेसह प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला; तसेच नियोजित सोळाव्या स्वानंद साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.

इंद्रजित पाटोळे, जयवंत भोसले, महेंद्र भारती, प्रा. प्रभाकर दाभाडे, कुमार खोंद्रे, सुप्रिया सोळांकुरे, प्रदीप गांधलीकर आणि स्वानंद महिला संस्थेचे पदाधिकारी यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रा. दिगंबर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले. अरुण गराडे यांनी आभार मानले.

## कन्व्हेअन्स टाळणाऱ्या बिल्डरला महारेराचा दणका
## ३० दिवसांत दस्त नोंदणीचे आदेश

पिंपरी (दै. संध्या)




कन्व्हेअन्स डीडची जबाबदारी टाळत केवळ मसुदा सोसायटीकडे पाठवून कर्तव्य पूर्ण झाल्याचा दावा करणाऱ्या बिल्डरला महाराष्ट्र रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणाने (महारेरा) चांगलाच दणका दिला आहे. किवळे येथील निर्माण माईलस्टोन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या तक्रारीवर सुनावणी करत महारेराने बिल्डर निर्माण व्हेंचरला ३० दिवसांत कन्व्हेअन्स डीडचा मसुदा अंतिम करून पुढील ३० दिवसांत सोसायटीच्या नावे दस्ताची नोंदणी करण्याचे आदेश दिले आहेत.

किवळे येथील निर्माण माईलस्टोन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीने अ‍ॅड. अजित बोराडे यांच्यामार्फत महारेराकडे तक्रार दाखल केली होती. या प्रकरणात महारेराचे सदस्य महेश पाठक यांनी १५ जुलै २०२६ रोजी आदेश पारित केला.

रेरा कायद्याच्या कलम १७ नुसार सोसायटीच्या नावे कन्व्हेअन्स करणे ही प्रवर्तक अर्थात बिल्डरची वैधानिक जबाबदारी आहे. केवळ कन्व्हेअन्स डीडचा मसुदा सोसायटीला पाठविल्याने ही जबाबदारी पूर्ण होत नाही. तसेच बिल्डर आणि जमीनमालक यांच्यात कोणताही वाद असला, तरी त्याचे कारण पुढे करून विकासक आपल्या कायदेशीर कर्तव्यातून मोकळा होऊ शकत नाही, असेही महारेराने आपल्या आदेशात नमूद केले आहे.

विकसकाद्वारे सोसायटीला पाठविलेल्या कन्व्हेअन्स डीडच्या मसुद्यात नमूद केलेले क्षेत्र मंजूर नकाशे व प्रकल्प नोंदणीतील क्षेत्रापेक्षा कमी असल्याने तक्रारदार संस्थेने त्यास आक्षेप घेतला होता. त्यावर निर्णय देताना महारेराने बिल्डरला मंजूर नकाशे व प्रकल्प नोंदणीतील नमूद क्षेत्रानुसार सर्व सामाईक क्षेत्रे, सामाईक मार्ग आणि त्यावरील अविभाज्य हक्क सोसायटीकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले आहेत.

महारेराच्या आदेशानुसार ३० दिवसांत परस्पर सहमतीने कन्व्हेअन्स डीडचा मसुदा निश्चित करायचा असून त्यानंतर पुढील ३० दिवसांत दस्ताची नोंदणी पूर्ण करावी लागणार आहे. कन्व्हेअन्ससाठी आवश्यक सर्व कागदपत्रेही सोसायटीकडे सुपूर्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महारेराने आदेशाचे पालन न केल्यास रेरा कायद्याच्या कलम ६३ अंतर्गत संबंधित बिल्डरविरोधात कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही दिला आहे.

## 'SIR' अन् संघटनात्मक कामगिरी ठरणार निर्णायक..!

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग समित्यांवरील स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीसाठी भारतीय जनता पक्षाने स्पष्ट निकष जाहीर केले असून, 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (SIR) मोहिमेतील कामगिरी आणि पक्षासाठी केलेले संघटनात्मक योगदान हेच निर्णायक ठरणार असल्याचे भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या विविध प्रभाग समित्यांवर एकूण ३० स्वीकृत सदस्यांची नियुक्ती दि.२७ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत होण्याची शक्यता असून, त्यासाठी पक्षांतर्गत प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.

यासंदर्भात शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी सांगितले की, प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांनी दि.१८ जुलै २०२६ रोजी भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात लिखित अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये पूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, प्रभाग क्रमांक, पक्षातील कार्याचा कालावधी, शैक्षणिक पात्रता, संपूर्ण रहिवासी पत्ता आदी माहिती नमूद करणे बंधनकारक राहणार आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी भाजपा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, भोसरीसाठी विकास डोळस आणि पिंपरीसाठी वैशाली खाडये यांच्याकडून जारी केलेले 'Task Letter Completion'च ग्राह्य धरण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाच्या संघटनात्मक विस्तारासाठी कार्यरत असलेल्या पदाधिकारी, बूथप्रमुख आणि सक्रिय कार्यकर्त्यांना आगामी काळात मोठी संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## पवना धरण ७७ टक्के भरले, तरी पिंपरी-चिंचवडकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार!

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या आठवड्यात जोरदार पाऊस होऊन पवना आणि इंद्रायणी नदीस पूर आला होता. तसेच, पवना धरण 77 टक्के भरले आहे. असे असतानाही शहरात सुरू असलेली 15 टक्के पाणी कपात यापुढेही सुरूच राहणार असल्याने प्रशासनाने जाहीर केले आहे.

जून महिना संपला तरी, पावसाळा सुरू न झाल्याने तसेच, शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात केवळ 16 टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने 15 टक्के पाणी कपात सुरू केली होती. ती कपात शहरात 19 जूनपासून सुरू करण्यात आली होती. त्यामुळे शहरात नेहमीपेक्षा अर्धा ते एक तासाने पाणी कमी सोडण्यात येत आहे. त्यामुळे शहरातील अनेक भागांत पाणीटंचाईचा सामना करावा लागला.

मात्र, जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावली. पाच व सहा जुलैला झालेल्या धुवाधार पावसामुळे पवना आणि इंद्रायणी नदीस पूर येऊन अनेकांच्या घरात तसेच, हाऊसिंग सोसायट्यांत पाणी शिरले. पवना धरणात अल्पावधीतच तब्बल 77.28 टक्के भरले आहे. त्यामुळे पाणी कपात रद्द होईल, अशी शहरवासीयांना आशा होती. मात्र, एल निनोचा प्रभाव कमी झाला नसून, पाण्याचे आतापासूनच नियोजन करून काटकसरीने पाण्याचा वापर करण्याची सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेस केली आहे. तसेच, पाणी कपात कायम ठेवण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने पाणी कपात मागे घेतलेली नाही.

## नीट - युजी २०२६ मध्ये अतुल्या डोंगरेची दैदिप्यमान भरारी

पिंपरी (दै. संध्या)



राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET-UG) 2026 मध्ये अतुल्या बाळासाहेब डोंगरे हिने ७२० पैकी ६७० गुण मिळवत अखिल भारतीय गुणवत्ता यादीत (AIR) ४९८ वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अतुल्याने दहावीपर्यंतचे शिक्षण आयसीएसई बोर्डातून, तर अकरावी आणि बारावीचे शिक्षण सीबीएसई बोर्डातून पूर्ण केले. बारावीच्या परीक्षेत तिने 97.6 टक्के गुण मिळवले. लहानपणापासूनच डॉक्टर होण्याचे ध्येय निश्चित केल्यामुळे तिने NEET परीक्षेची तयारी शिस्तबद्ध पद्धतीने केली.

यशाचे श्रेय देताना अतुल्या म्हणाली, "नियमित वर्गांना उपस्थित राहणे, रोजचा अभ्यास त्याच दिवशी पूर्ण करणे आणि कोणताही बॅकलॉग न ठेवणे, या सवयी मी कायम जोपासल्या. अभ्यासातील शंका तत्काळ शिक्षकांकडून दूर करून घेतल्या. जीवशास्त्रासाठी एनसीईआरटीच्या पुस्तकाचा सखोल अभ्यास केला, तर भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्रासाठी भरपूर प्रश्नांचा सराव केला. परीक्षेच्या काळात तणाव होता; मात्र पालक आणि शिक्षकांच्या पाठिंब्यामुळे आत्मविश्वास कायम राहिला."

भविष्यातील नियोजनाबाबत ती म्हणाली, "उत्कृष्ट वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून पुढे आवडीच्या विषयात विशेष प्राविण्य मिळवायचे आहे. त्यानंतर देशातच राहून वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून समाजासाठी काम करण्याची इच्छा आहे."

अतुल्याचे वडील बाळासाहेब डोंगरे म्हणाले, "डॉक्टर होण्याचा निर्धार तिने बालपणापासून केला होता. त्या दिशेने तिने सातत्याने मेहनत घेतली. आम्ही तिच्या प्रत्येक निर्णयात तिच्या पाठीशी उभे राहिलो. तिच्या यशाचा आम्हाला मनापासून अभिमान आहे."

आई शर्मिला डोंगरे म्हणाल्या, "अतुल्या लहानपणापासून अभ्यासू, जिद्दी आणि मेहनती आहे. एखादे उद्दिष्ट निश्चित केले की ते पूर्ण केल्याशिवाय ती थांबत नाही. तिच्या मेहनतीचे आज सार्थक झाले असून तिच्या यशाचा आम्हाला खूप आनंद आहे."

NEET-UG 2026 मधील या उल्लेखनीय यशामुळे अतुल्या डोंगरेने वैद्यकीय शिक्षणाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी विविध स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# नागरिकांचे प्राण वाचवणाऱ्या पीएमआरडीए अग्निशमन जवानांचीच उपेक्षा

पिंपरी (दै. संध्या)

आपत्कालीन परिस्थितीत जीवाची पर्वा न करता नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी धावणाऱ्या पीएमआरडीएच्या अग्निशमन व पीडीआरएफ विभागातील जवानांनाच वेळेवर वेतन व भत्ते मिळत नसल्याची बाब समोर आली आहे. अनेक कर्मचाऱ्यांना आपत्कालीन कामकाजादरम्यान स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागत असून, काहीवेळा उपाशीपोटीच काम करण्याची वेळ येत असल्याची खंत कर्मचाऱ्यांनी नाव उघड न करण्याच्या अटीवर व्यक्त केली आहे.

गेल्या आठवड्यात मावळ तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसाने निर्माण झालेल्या पूरस्थितीत अनेक नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याची जबाबदारी पीएमआरडीएच्या पीडीआरएफ जवानांनी यशस्वीपणे पार पाडली. जीव धोक्यात घालून बचावकार्य करणाऱ्या या कर्मचाऱ्यांनाच अन्न व इतर आवश्यक सुविधांचा अभाव जाणवल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आपत्तीच्या काळात नागरिकांचे प्राण वाचविणाऱ्या यंत्रणेचीच अवस्था बिकट असल्याचे चित्र समोर आले आहे.



पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात तब्बल 674 गावे आणि सुमारे सात हजार चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. या विस्तीर्ण भागात राष्ट्रीय व राज्य महामार्ग, औद्योगिक वसाहती, डोंगरमाथ्यावरील गावे, मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, धरणे, तलाव आणि वेगाने विकसित होणारी उपनगरे आहेत. मात्र, या संपूर्ण क्षेत्रासाठी सध्या केवळ वाघोली, मारुंजी आणि नांदेड सिटी येथे तीनच अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत. वाढते नागरीकरण आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता, ही संख्या अपुरी असल्याचे स्पष्ट होत आहे.

सर्व पदे कायमस्वरूपी भरणे शक्य नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन, प्रवास भत्ता किंवा इतर सुविधा वेळेवर मिळत नसल्याची बाब यातील काही जवानांनी निदर्शनास आणून दिली आहे. आपत्कालीन मोहिमांमध्ये अनेकदा स्वतःच्या पैशातून इंधन, अल्पोपहार किंवा इतर आवश्यक खर्च करावा लागत असल्याने आर्थिक अडचणी वाढत आहेत. यामुळे मनोबलावर परिणाम होत असल्याचेही काही जवानांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले. आमचे नाव उघड केले तर असलेली कंत्राटी नोकरीही जाईल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. यासंदर्भात पीएमआरडीएचे अग्निशमन विभागप्रमुख देवेंद्र पोटफोडे तसेच जनसंपर्क अधिकारी पुरुषोत्तम सांगळे यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यांनी बोलण्याचे वा प्रतिक्रिया देण्याचे टाळले. त्यामुळे या प्रश्नाची दखल घेऊन पीएमआरडीएच्या महानगर आयुक्तांनी अग्निशमन व पीडीआरएफ विभागातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडवाव्यात, अशी मागणी होत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पीएमआरडीएने सुमारे 150 कोटी रुपयांचा खर्च करून दहा नवीन अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला. ही केंद्रे उभी राहिल्यास प्रतिसादाचा वेळ कमी होऊन आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम होणार आहे. मात्र, नवीन केंद्रे सुरू होईपर्यंत विद्यमान कर्मचाऱ्यांवरच मोठा ताण कायम राहणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### समर्थ ज्युनियर कॉलेजमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

नारायणगाव (दैनिक संध्या) : येथील समर्थ ज्युनियर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गौरव सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी बारावी विज्ञान शाखेतून वैष्णवी येवले हिने प्रथम क्रमांक, रिद्धी थिटे हिने द्वितीय क्रमांक, तर श्रुती शिंदे हिने तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेतून फातिमा इकरा हिने प्रथम, साई काळे याने द्वितीय आणि दर्शन गाडगे याने तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय एमएचटी-सीईटी आणि एमएचटी-सीईटी नर्सिंग परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना प्राचार्य राजीव सावंत यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार करिअर निवडण्याचा सल्ला दिला. या सोहळ्याचे नियोजन प्रा. संतोष पोटे, प्रा. अमोल खामकर, प्रा. राजेंद्र नवले, प्रा. संगीता रिठे, प्रा. रोहिणी औटी, प्रा. नूतन पोखरकर यांनी केले. या सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलता शेळके आणि समर्थ ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर यांच्यासह अनेक मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. प्रदीप गाडेकर यांनी मानले.




### तरडोलीत अॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्यावतीने आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

तरडोली (दैनिक संध्या) : तरडोली येथे अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती यांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.या शिबिराला तरडोली गावचे प्रशासक महेंद्र तांबे,तरडोली गावच्या ग्रामसेविका रूपाली म्हेत्रे, गावचे पोलीस पाटील बाळू जाधव, सागर सर्जे, रामचंद्र भोसले, परेश भापकर, बाळासो जाधव, संजय भापकर, सागर भापकर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाला पन्नास ते साठ जणांची तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ.सर्वोदय यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. सर्व रूग्णांची आरोग्य तपासणी करून मोबाईल नंबरची नोंद घेण्यात आली आहे. गावातील ग्रामस्थांनी डॉक्टर व डॉक्टरच्या टीमचे स्वागत केले व आभार मानले.

### जेजुरीतील जिजामाता विद्यालयात आधार अपडेशन कॅम्प उत्साहात संपन्न

जेजुरी (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांना आधार कार्ड अद्ययावत (अपडेशन) करण्याची सुविधा विद्यालयातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी, ता. पुरंदर येथे आधार अपडेशन कॅम्प यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. हा उपक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.



कार्यक्रमाचे नियोजन जिजामाता प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक यांनी केले. या शिबिरात शिवरी येथील आधार केंद्राच्या केंद्रचालक दीपिका रजनीकांत झेंडे तसेच ऑपरेटर प्रेम अमोल टिळेकर यांनी विद्यार्थ्यांच्या आधार कार्डावरील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, छायाचित्र आणि बायोमेट्रिक माहिती अद्ययावत करण्याचे काम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडले. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या आधार कार्डवरील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, छायाचित्र व बायोमेट्रिक माहिती अद्ययावत करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थी व पालकांची मोठी गैरसोय टळली तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली आधार माहिती अचूक व अद्ययावत करण्यास मदत झाली. विद्यालयाच्या या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

### कुरकुंभ एमआयडीसीत विषारी दारूचा कारखाना उद्ध्वस्त

कुरकुंभ (दैनिक संध्या) : समर्थ लॅबोरेटरीजच्या परिसरात सुरू असलेल्या अवैध कारखान्यावर छापा टाकून तब्बल ३४२० किलो क्लोरल हायड्रेट आणि त्याच्या निर्मितीसाठी वापरले जाणारे ५८०० लिटर कच्चे केमिकल जप्त करण्यात आले आहे. या कारवाईमुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, कोल्हापूर कृती विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सुमारे दीड महिन्यापासून या ठिकाणी गुप्त पाळत ठेवण्यात आली होती. त्यानंतर २९ जून २०२६ रोजी कारवाई करण्यात आली. तपासादरम्यान संशयित ठिकाणी मोठ्या प्रमाणात पिवळसर रंगाचा स्फटिकासारखा पदार्थ व रसायने आढळून आली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये किशोर दत्तात्रय सुर्वे (वय ५२), शैलेश विठ्ठल ठाकूर (वय ५५), नबी सरवर जमीर सिद्दीकी (वय ४०) आणि आदेश विठ्ठल पाचांगणे (वय ५८) यांचा समावेश आहे. प्राथमिक तपासात ही अवैध फॅक्टरी चालविली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.



# प्रा.डॉ.जगताप यांना मराठी विषयात पीएच.डी. प्राप्त

जेजुरी (दै. संध्या)




श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी येथील मराठी विषयाचे गाढे अभ्यासक, प्रा.डॉ. मधुसूदन जगताप यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून मराठी वाङ्मय विषयात 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) ही पदवी प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयात त्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, जेजुरीचे माजी नगराध्यक्ष रमेशदादा गावडे, नंदकुमार निरगुडे,राहुल तांबे,आकाश भोसले, प्रतीक्षा काळे यांच्या हस्ते डॉ. मधुसूदन जगताप यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य नंदकुमार सागर यांनी डॉ.मधुसूदन जगताप यांचे अभिनंदन करताना सांगितले की, "प्रामाणिक संशोधन, अभ्यासू वृत्ती आणि ज्ञानसाधनेची अखंड तळमळ यामुळे मिळालेले हे यश संपूर्ण विद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या संशोधनाचा लाभ विद्यार्थी, शिक्षक आणि मराठी साहित्य क्षेत्राला निश्चितच होईल. संशोधनाची ही प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरेल."

सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. मधुसूदन जगताप म्हणाले, "पीएच. डी. ही केवळ माझी वैयक्तिक उपलब्धी नसून माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या संस्थेची, मार्गदर्शकांची, सहकारी शिक्षकांची, कुटुंबीयांची आणि विद्यार्थ्यांची सामूहिक प्रेरणा आहे. संशोधन ही अखंड चालणारी ज्ञानसाधना असून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी भविष्यातही मी अधिक जोमाने कार्य करणार आहे. या सन्मानामुळे माझी जबाबदारी अधिक वाढली असून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला अधिक उंचीवर नेण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन."

डॉ.मधुसूदन जगताप यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव, मा. आमदार संजयजी चंदुकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त राजवर्धनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, तसेच व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे आणि रवींद्रपंत जगताप यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक, संशोधन व साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे नियोजन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे,पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, संपतराव कड,गणेश खळदकर,माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, सोमनाथ उबाळे, अजय जगताप,योगेश घोरपडे,राजाराम पिसाळ, महेश खाडे,गणेश भंडलकर, मयुर शिंदे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक, कैलास सोनवणे, सोनबा दुर्गाडे,राघू हारुळे आणि कुलदीप साळवे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र ताम्हाणे व सागर चव्हाण यांनी केले.

विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. मधुसूदन जगताप यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशाचा गौरव केला. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच जेजुरी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, हे यश संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा, संशोधनपर परंपरेचा आणि ज्ञानसाधनेचा आणखी एक मानाचा तुरा ठरले आहे.

## माहूर माध्यमिक विद्यालयात आषाढी वारीनिमित्त विद्यार्थ्यांच्या बाल दिंडीचे उत्साहात आयोजन

काळदरी (दै. संध्या)



आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने माहूर माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सहभागातून पारंपरिक बाल दिंडीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या दिंडीत विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ, मृदंग, वीणा आणि भगव्या पताका हातात घेत "ज्ञानोबा-तुकाराम", "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" अशा नामघोषात परिसर भक्तिमय केला.

दिंडीची सुरुवात विद्यालय परिसरातून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांच्या अभंगांचे गायन करत समाजात भक्ती, समता, बंधुभाव आणि संस्कारांचा संदेश दिला. दिंडीत विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार यांनी विद्यार्थ्यांना आषाढी वारीचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व सांगत वारकरी परंपरेतून समाजात एकात्मता, शिस्त, सेवा आणि सद्भावनेचे संस्कार रुजतात, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयातील शिक्षकांनी केले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागामुळे आणि भक्तिमय वातावरणामुळे बाल दिंडीचे आयोजन अत्यंत उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडले. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व सांस्कृतिक मूल्ये जोपासणारा हा उपक्रम असल्याची भावना व्यक्त केली.

विद्यालयाच्या या उपक्रमाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भाजपचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव माजी आमदार संजयजी (चंदूकाका) जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, तसेच व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्रपंत जगताप यांनी विद्यालयाचे कौतुक केले.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक महेंद्र भोसले, रामप्रभू पेटकर, रामचंद्र जगताप, इंद्रभान पठारे, विकास राऊत, लता गायकवाड, स्नेहलता टिळेकर, मंगल जगताप, श्रीकांत खोमणे, रामभाऊ कुंभार, श्रीकांत गव्हाणे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## चाकणमधील तळेगाव चौकातील सिग्नलच्या वेळेत बदल करा; नागरिकांची मागणी

चाकण (दै. संध्या)

वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकण्यापेक्षा चाकणमधील तळेगाव चौकातील सिग्नलच्या वेळेत किंचितसा बदल करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. नित्याच्या वाहतूक कोंडीने चाकणकर ग्रामस्थांचा श्वास गुदमरला असून, प्रवासी व नागरिक बेजार झाले आहेत. थोडासा दिलासा मिळाला म्हणून पुणे - नाशिक महामार्गावरील चाकण गावच्या हद्दीतील तळेगाव चौकातील सिग्नलच्या वेळेत किंचितसा बदल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

त्यामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे सुलभ होईल. चाकण गावाकडुन तळेगाव दाभाडे जाणाऱ्या सर्व गाड्यांसाठी सिग्नलची वेळ वाढवून देण्याची गरज निर्माण झाली आहे. मोशी कडून राजगुरूनगरकडे व राजगुरूकडून मोशीकडे जाताना दिलेला सिग्नलचा वेळ योग्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तळेगाव दाभाडे कडून मोशीकडे जाताना दिलेला सिग्नलचा वेळ आणखी थोडासा वाढविणे अपेक्षित आहे. सिग्नल यंत्रणेत थोडासा बदल केल्यास चाकण चौकांमध्ये बऱ्याचशा प्रमाणात वाहतुकीचा त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते.





## नगरपरिषद हद्दीतील जमिनींचे क्षेत्र गावठाणामध्ये समाविष्ट करण्याची मागणी

चाकण (दै. संध्या)

जमाबंदी आयुक्तांच्या परिपत्रकानुसार नगरपरिषद हद्दीतील जमिनींचे क्षेत्र गावठाणामध्ये समाविष्ट करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

राज्य शासनाच्या शासन निर्णयान्वये चाकण नगरपरिषद हद्दीतील जमिनींचे क्षेत्र हे गावठाणामध्ये समाविष्ट करण्यासाठी माजी आमदार दिलीप मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांना एक लेखी निवेदन देण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी डॉ. जाधव यांनी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा केली. सदरील विषयास अंशतः मान्यता देण्यात आल्यामुळे चाकण मधील शेतकऱ्यांना अधिक लाभ होणार व शेतकऱ्यांना कायदेशीर बांधकामास अडथळा येणार नाही.

सात बाराचे रूपांतर हे प्रॉपर्टी कार्ड मध्ये समाविष्ट होणार आहे. मुख्याधिकारी डॉ. जाधव यांनी संबंधित विषय येणाऱ्या बैठकीत ठराव घेण्यास अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. यावेळी माजी उपसरपंच कालिदास वाडेकर, चाकण शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष राम गोरे, चाकण शहर अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष मुबीन काझी, उद्योजक शांताराम आगरकर, सामाजिक कार्यकर्ते अनिल देशमुख, अमोघ धाडगे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओतूर परिसरातील देवगल्ली-रोहोकडवेस रस्त्याची खड्ड्यांमुळे दुरवस्था

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील देवगल्ली (गाढवे आळी) ते रोहोकडवेस या मुख्य रस्त्याची सध्या अत्यंत दुरवस्था झाली आहे. संपूर्ण रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.


या महत्त्वाच्या मार्गावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात. चैतन्य विद्यालय, गाडगे महाराज विद्यालय, क्रीडा संकुल, पोलीस स्टेशन, वन विभाग कार्यालय, कृषी कार्यालय आणि कपर्दीकेश्वर मंदिर यांसारखी महत्त्वाची ठिकाणे याच रस्त्यावर जोडलेली आहेत. तसेच पाथरटवाडी, राहाटी, बाबीतमळा, आणि शेटेवाडी परिसरातील नागरिकांचीही या रस्त्यावरून सतत वर्दळ असते. मात्र, सध्या रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्डयांमुळे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे.

अनेक वाहनचालकांना पाठदुखी आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पुढील महिन्यात श्री भगवान कपर्दीकेश्वर ओतूर येथे मोठी यात्रा सुरू होणार आहे. या यात्रेसाठी परिसरातील हजारो भाविक या मार्गाचा वापर करून मंदिरात दर्शनासाठी येत असतात. यात्रेपूर्वी या रस्त्याची दुरुस्ती झाली नाही, तर भाविकांची आणि शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होईल, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

ओतूर-ब्राह्मणवाडा मार्गापासून जिल्हा परिषद शाळेजवळील रस्ता, चैतन्य विद्यालय आणि क्रीडा संकुल ते कपर्दीकेश्वर मंदिरापर्यंतच्या या संपूर्ण मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी आग्रही मागणी राजेंद्र हांडे देशमुख, अभिषेक घोलप, पी. के. हांडे देशमुख, संजय डुंबरे,काशिनाथ साबळे, मंगेश खेत्री, यतीश येरंडे, आर. एम. गाढवे, विकास चव्हाण, शंकर जाधव, दीपक हांडे देशमुख यांसह अनेक ग्रामस्थांनी केली आहे.

# बारामतीमध्ये डी.जे.अम्युझमेंट्स सादर करत आहे टायटैनिक एक्सिबिशन

बारामती (दै. संध्या)




आदरणीय अजितदादा पवार यांच्या विकसित बारामतीत आमचं भाग्य लाभतंय की आम्ही टायटॅनिक प्रदर्शन घेऊन आलो आहोत,याआधी देखील दादांनी आम्हाला सहकार्य केले होते. आज त्यांची आठवण कायम आमच्या स्मरणात राहील,आपल्या बारामतीत तीन चार एकरात टायटॅनिक मॉडेल तयार केले असून यामध्ये खोल्या ऐतिहासिक कलाकृती पाहायला मिळणार आहे.

बारामतीमध्ये प्रथमच टायटॅनिक संग्रहालय उभे राहिले आहे, यामध्ये 14 एप्रिल 1912 रोजी घडलेल्या घटनेची माहिती पाहता येणार आहे त्याचबरोबर रोमांचक राईड्स, ग्राहक स्टॉल, शॉपिंग झोन, फूड कोर्ट, अम्युझमेंट पार्क, खऱ्या कथा, कलाकृती आणि इतिहास शोधा.

सर्वोत्तम उत्पादने, ब्रँड्स आणि बरेच काही फॅशन, जीवनशैली, अॅक्सेसरीज आणि बरेच काही लहान मुलांपासून ते सर्व वयोगटातील लोकांसाठी खास आकर्षण मौत का कुवा पाहायला मिळणार आहे, त्याचबरोबर जायंट व्हील,कोलंबस,भूत बंगला,सलाम्बो,ड्रॅगनट्रेन, ब्रेक डान्स,आणखीनही बरचं काही. तसेच खास बच्चे कंपनीसाठी पेडलबोट, जंपिंग,मिनी ट्रेन इत्यादी अनेक मनोरंजक राइड्स आहेत. वेगवेगळ्या स्टॉलच्या माध्यमातून घरगुती वस्तू, क्रीडा उपकरणे, कूलिंग भांडी, मुलांसाठी खेळणी आणि हे सर्व एकाच छताखाली. त्याचबरोबर स्वादिष्ट खाद्यपदार्थ, स्नॅक्स, पॉप-कॉर्न, कॉटन कँडी, पाणीपुरी, चाट, चिल्ली गोडी, मिरची भजी, आईस्क्रीम. दिल्ली अप्पलम इ. प्रत्येक चवीसाठी स्वादिष्ट खाद्यपदार्थ सर्व वयोगटांसाठी रोमांचक राईड्स आणि मजा फोटो पॉइंट्स संपूर्ण कुटुंबासाठी मजा आणि मनोरंजनासाठी सर्वांनी सहकुटुंब प्रदर्शनाला भेट द्यावी.

एकदा आयुष्यभरातील हा अनुभव घ्या,अमर्याद मजा, ज्ञान, आठवणी सर्व एकाच छताखाली. चुकवू नका हा ग्रँड अनुभव, विद्यार्थी जोडपे, पर्यटक, कुटुंब व मित्र परिवारासोबत भेट द्या.या प्रदर्शनाचे आयोजन डी जे अम्युजमेंट चे c k दिनेशकुमार व ck जयप्रकाश यांच्या संकल्पनेतून भव्य असे सेटअप उभा राहिला असल्याचे टायटैनिक प्रदर्शनचे मॅनेजर रवी एन नायर यांनी दिली यावेळी मॅनेजर k k जयराज व संतोष जाधव यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.असून बारामतीतील क्रोमा शोरूम जवळ,स्वातंत्र सैनिक संभाजीराव गालिंदे नगर, सहयोग सोसायटी समोर, भिगवण रोड, बारामती. याठिकाणी आपल्याला पाहता येणार आहे.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# पुण्याच्या विकासाला नवी गती देणारे मार्ग ‘गेम चेंजर‘ ठरतील : सुनेत्रा पवार

■ पुणे (दै. संध्या)



पान १ वरून

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले, पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची गंभीर समस्या दूर करण्यासाठी पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर आणि हडपसर-यवत हे तीन उन्नत मार्गांचे प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादनाची मोठी अडचण असल्याने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे उन्नत मार्ग उभारले जात आहेत. या तिन्ही प्रकल्पांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असून, त्यामुळे पुण्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रकल्पांच्या उभारणीसाठी राज्य शासनाने दिलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल गडकरी यांनी समाधान व्यक्त केले. या प्रकल्पांमध्ये वापरण्यात येणाऱ्या पोलाद आणि सिमेंटवरील राज्य शासनाच्या हिस्याचा वस्तू व सेवा कर माफ करण्यात आला आहे. तसेच, वाळू, खडी आणि अन्य बांधकाम साहित्यावरील स्वामित्व धन माफ करण्याबरोबरच भूसंपादन प्रक्रियेलाही शासनाने मोठे सहकार्य केले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळेच या प्रकल्पांना अपेक्षित गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

रस्ते आणि पुलांच्या बांधकामात जागतिक दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जात असल्याचे श्री.गडकरी यांनी सांगितले. मलेशियामध्ये विकसित करण्यात आलेल्या ‘अल्ट्रा हाय परफॉर्मन्स फायबर रिइन्फोर्समेंट काँक्रिट’ या तंत्रज्ञानामुळे पुलांतील दोन खांबांमधील अंतर ३० मीटरवरून १२० मीटरपर्यंत वाढविणे शक्य झाले आहे. त्यामुळे खर्चात बचत होण्याबरोबरच एकाच खांबावर रस्ता, पूल आणि मेट्रो अशी अत्याधुनिक रचना उभारता येणार आहे. पुलांची सुरक्षितता आणि गुणवत्ता अबाधित राहण्यासाठी रबरी बेअरिंग्ज व एक्स्पान्शन जॉइंट्सच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करू, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना दिल्या.

केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले, पुणे आणि मुंबईतील वाहतूक कोंडी कायमस्वरूपी कमी करण्यासाठी उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी वाहतूक शहराबाहेरून वळविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सुरत-नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर या नव्या महामार्गामुळे उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी सुमारे ४० ते ४५ टक्के वाहतूक पुणे आणि मुंबईत प्रवेश करणार नाही. तसेच, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाचे काम ऐतिहासिक स्वरूपाचे झाले असून, या मार्गावर वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच ज्ञानेश्वरीत उल्लेख असलेल्या वृक्षांची लागवड करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

राज्यातील इतर महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांनाही गती देण्यात येत असल्याचे गडकरी यांनी सांगितले. नाशिक फाटा ते खेड या ३० किलोमीटर लांबीच्या सुमारे ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, भूसंपादन पूर्ण होताच कामाला सुरुवात केली जाईल. खंबाटकी घाटातील नवीन बोगद्याचे काम अंतिम टप्प्यात असून, त्याचे उद्घाटन लवकरच करण्यात येणार आहे. तसेच, जुन्या मुंबई-पुणे मार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी ठाणे ते पुणे आणि पुढे शिरूरमार्गे छत्रपती संभाजीनगरपर्यंत जोडणाऱ्या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या नव्या महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पुण्याचा वाढता विस्तार आणि त्यामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर व हडपसर-यवत या तीन उन्नत महामार्ग प्रकल्पांमुळे पुण्याच्या विकासाला नवी गती मिळेल आणि हे मार्ग खऱ्या अर्थाने ‘गेम चेंजर’ ठरतील. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्व व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागल्याचे त्यांनी नमूद केले.

पुणे-शिरूर उन्नत मार्ग अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि बहुविध वाहतूक जोडणी या संकल्पनेवर आधारित असून, त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सुकर होणार आहे. हडपसर-यवत मार्गामुळे वाहतुकीचा ताण कमी होऊन वेळेची बचत होईल, तर तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गामुळे औद्योगिक पट्ट्याला आधुनिक रस्ते संपर्क उपलब्ध होऊन मालवाहतुकीला वेग मिळेल तसेच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असे त्यांनी सांगितले.

पुणे हे केवळ विद्येचे माहेरघर नसून उद्योग, तंत्रज्ञान आणि रोजगाराचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने विकसित होत आहे. पुणे मेट्रो, रिंग रोड, विमानतळाच्या नवीन टर्मिनलचा विस्तार, पिंपरी-चिंचवड व हिंजवडी आयटी पार्कचा विस्तार तसेच चाकण-तळेगाव औद्योगिक पट्ट्याच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे काम प्रभावीपणे सुरू असल्याचे श्रीमती पवार यांनी नमूद केले.

नाशिक फाटा ते राजगुरूनगर उन्नत महामार्ग हा पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उत्तर महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे सांगून, भूसंपादनातील तांत्रिक अडचणी दूर करून हा प्रकल्पही लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी सूचना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केली.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, पुणे-शिरूर, तळेगाव-चाकण-शिक्रापूर व हडपसर-यवत या तीन महत्त्वाकांक्षी उन्नत मार्ग प्रकल्पांमुळे पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था व महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यावर शासनाचा भर असून, बदलत्या हवामानालाही तोंड देऊ शकणारी दर्जेदार कामे करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येला, औद्योगिक विकासाला, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विस्ताराला व शिक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन भविष्योन्मुख नियोजन करण्यात येत आहे. सासवड-पुरंदर विमानतळ, वाढती वाहतूक व शहराचा विस्तार विचारात घेऊन पुण्याला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचे उद्दिष्ट आहे. शहरात ३०० किलोमीटरहून अधिक लांबीच्या सायकल मार्गांच्या विकासालाही गती देण्यात येणार असल्याचे मंत्री भोसले म्हणाले.

या प्रकल्पांमध्ये चौपदरी, सहापदरी व उन्नत मार्गांचा समावेश असून, हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक लांबीचा उन्नत मार्ग निर्माण होईल, असेही त्यांनी सांगितले. तसेच राज्याने उभारलेल्या विविध पायाभूत सुविधांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही वेगळी ओळख निर्माण केल्याचे मंत्री भोसले यांनी नमूद केले.


यावेळी आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, विक्रम काकडे, भीमराव अण्णा तापकीर, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, सुनील कांबळे, चेतन तुपे, सुनील शेळके, बाबाजी काळे, हेमंत रासने, शंकर मांडेकर, शंकर जगताप, ज्ञानेश्वर कटके, विभागीय आयुक्त शीतल तेली – उगले, पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित यांनी प्रास्ताविक केले.

## तिन्ही रस्ते प्रकल्पाचे वैशिष्ट्य

पुणे–शिरूर महामार्ग प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ वरील सुमारे ५४ किलोमीटर मार्गाचा विकास करण्यात येणार आहे. या प्रकल्पात पहिल्या ३१ किलोमीटरमध्ये सहा पदरी उन्नत महामार्ग, तर स्थानिक वाहतुकीसाठी समांतर चार पदरी रस्ता विकसित केला जाणार आहे. उन्नत महामार्गाच्या सुरुवातीच्या सात किलोमीटर भागात भविष्यातील मेट्रो मार्गासाठीही तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे ते शिरूर प्रवासाचा कालावधी सुमारे दीड ते दोन तासांवरून ४५ ते ५० मिनिटांपर्यंत कमी होणार असून, वाहतूक अधिक सुरक्षित आणि गतिमान होईल. हडपसर–यवत महामार्ग प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३१.५ किलोमीटर असून, त्यामध्ये सुमारे २५ किलोमीटरचा उन्नत बहुस्तरीय महामार्ग आणि सहा पदरी भूपृष्ठावरील रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पात उरुळी कांचनपर्यंत भविष्यातील मेट्रो मार्गासाठीही स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. तसेच हा मार्ग पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ आणि पुणे रिंगरोडशी जोडला जाणार असल्याने वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होऊन प्रवास सुलभ व सुरक्षित होईल. तळेगाव–चाकण–शिक्रापूर कॉरिडॉर हा सुमारे ५३ किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा प्रकल्प असून, त्याअंतर्गत सुमारे २६ किलोमीटरचा उन्नत बहुस्तरीय महामार्ग आणि ५३.२ किलोमीटर लांबीचा चार पदरी भूपृष्ठावरील रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जलदगती वाहने आणि स्थानिक वाहतूक स्वतंत्र मार्गाने होणार असल्याने वाहतूक कोंडी कमी होईल. चाकण औद्योगिक परिसर, पुणे रिंगरोड आणि राष्ट्रीय महामार्गांना प्रभावी जोडणी मिळाल्याने औद्योगिक, व्यापारी आणि लॉजिस्टिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, पुणे परिसरातील वाहतूक अधिक वेगवान, सुरक्षित आणि आधुनिक होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### २२ जुलै रोजी कृषी व पशुधन प्रदर्शन : आ. भरणे

मुंबई (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त 22 जुलै 2026 रोजी कृषी महाविद्यालय, पुणे येथे राज्यस्तरीय कृषी व पशुधन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ऑगस्टमध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात प्रदर्शनाची सांगता होणार आहे. या प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उपस्थित राहणार आहेत. हे कृषी प्रदर्शन राज्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि मूल्यवर्धित शेतीचा प्रभावी मेळावा ठरेल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले आहे. मंत्री भरणे म्हणाले, या प्रदर्शनात राज्यभरातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), कृषी उद्योजक, संशोधक, कृषी विद्यापीठे तसेच विविध शासकीय संस्थांचा सहभाग असेल. आधुनिक शेतीतील तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, पूरक व्यवसाय, पशुधन विकास, तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त नवकल्पनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या प्रदर्शनाचा उद्देश आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल. प्रदर्शनामध्ये कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, महाबीज, स्मार्ट प्रकल्प, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, विविध शेतकरी उत्पादक संस्था, कृषी स्टार्टअप्स तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील आधुनिक उपक्रमांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय यशस्वी शेतकरी, संशोधक आणि कृषी उद्योजक यांच्या सहभागातून विविध विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. आधुनिक शेतीच्या संधी आणि आव्हानांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण, कृषी क्षेत्रातील नवोन्मेष, मूल्यसाखळी विकास, कृषी प्रक्रिया आणि ग्रामीण उद्योजकता याविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष माहिती कक्ष उभारण्यात येणार आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांची माहितीही शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाईल, असेही मंत्री भरणे म्हणाले.

## ‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनें’तर्गत बोधगयासाठी विशेष तीर्थयात्रा रेल्वेचे २० जुलै रोजी प्रस्थान

■ मुंबई (दै. संध्या)

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ‘मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनें’तर्गत मुंबई विभागातील ८०० पात्र लाभार्थ्यांसाठी बिहारमधील बोधगया येथे विशेष तीर्थयात्रा रेल्वेसेवेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ही विशेष रेल्वे सोमवार, दि.२० जुलै रोजी दुपारी २ वाजता दादर स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक १४ वरुन प्रस्थान करणार आहे. राज्यातील नागरिकांना देशातील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या तीर्थस्थळांचे दर्शन घडवून आणणे, तसेच समाजातील विविध घटकांना अध्यात्म, सांस्कृतिक वारसा आणि राष्ट्रीय एकात्मतेची अनुभूती देणे, हा मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

या विशेष तीर्थयात्रेत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांतील पात्र लाभार्थी दि. २० जुलै ते २६ जुलै २०२६ या कालावधीत सहभागी होणार आहे. विशेष रेल्वेच्या प्रस्थान कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंढे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झालेल्या बोधगया या जागतिक कीर्तीच्या पवित्र स्थळाला भेट देण्याची संधी या विशेष तीर्थयात्रेमुळे लाभार्थ्यांना मिळणार आहे. बौद्ध धम्मातील अत्यंत महत्त्वाचे श्रद्धास्थान असलेल्या बोधगयेचे दर्शन सुरक्षित, सुसंघटित आणि सुलभ पद्धतीने घडवून आणण्यासाठी शासनाने ही विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून दिली आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेच्या माध्यमातून राज्यातील पात्र नागरिकांना तीर्थदर्शनाची संधी उपलब्ध करून देतानाच शासनाच्या लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक उपक्रमांना अधिक बळकटी मिळत आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

## राज्यपालांच्या उपस्थितीत मुंबईतील जगन्नाथ रथयात्रेला आरंभ

■ मुंबई (दै. संध्या)



झाडू घेऊन राज्यपालांकडून रथयात्रा मार्गिकेची स्वच्छता


इस्कॉन, जुहू तर्फे आयोजित ४५ व्या श्री जगन्नाथ रथयात्रेला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत भक्तिवेदांत स्वामी मिशन स्कुल, अंधेरी, मुंबई येथून आरंभ झाला. यावेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीत राज्यपालांनी रथावर आरूढ भगवान जगन्नाथ, बलदेव व सुभद्रा यांच्या प्रतिमांची आरती केली व रथयात्रेच्या मार्गिकेला झाडून स्वच्छ केले.

रथयात्रा हा सनातन धर्म व भारतीय संस्कृतीतील एकमेवाद्वितीय अनुभव आहे. या उत्सवानिमित्त भगवान जगन्नाथ मंदिरातून बाहेर पडून भक्तांच्या भेटीसाठी बाहेर येतात. पूर्वी जगन्नाथ पुरी तसेच काही ठिकाणी सीमित असलेला जगन्नाथ रथयात्रा महोत्सव इस्कॉनचे संस्थापक श्रील प्रभुपाद यांनी जगाच्या विभिन्न भागात पोहोचवला असे राज्यपालांनी सांगितले. जो इतरांचे दुःख, कष्ट जाणतो त्यालाच ‘वैष्णव’ असे म्हणतात असे सांगत भक्तीला कृतीची जोड दिल्यास ती ईश्वरीय सेवा होते असे राज्यपाल म्हणाले. आपण करीत असलेले प्रत्येक कार्य भक्तीने केल्यास ती सेवा ठरते. कृष्णभक्ती ही गीत, नृत्य साधनेच्या माध्यमातून देखील केली जाते, असेही त्यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आजच्या युगात भक्तिभाव विशेष आवश्यक आहे. त्यातूनच मानवी कल्याण साधेल असे त्यांनी सांगितले. श्रील प्रभुपाद हे वयाच्या सत्तराव्या वर्षी अमेरिकेत गेले व त्यांनी जगाला सोपा असा महामंत्र दिला असे सांगून राज्यपालांनी इस्कॉनच्या कार्याची प्रशंसा केली.

यावेळी बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी जगन्नाथ पुरीच्या रथयात्रेचा अनुभव मुंबईत दिल्याबद्दल इस्कॉनचे आभार मानले. रथयात्रा ही भक्ती, शक्ती, प्रेम व करुणेचे प्रतीक आहे. आपण नृत्यसाधनेच्या माध्यमातून कृष्णभक्ती करीत आहोत. नृत्यामुळे आपण भगवान कृष्णाशी जोडून राहिलो असे खासदार हेमा मालिनी यांनी यावेळी सांगितले. रथयात्रा अंधेरी येथून जुहू येथील इस्कॉन मंदिर येथे समाप्त होणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी आमदार अमित साटम, हिंदुजा समूहाचे अध्यक्ष प्रकाश हिंदुजा, रथयात्रा महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. सूरदास, इस्कॉन जुहूच्या अध्यक्ष बृजहारी दास, उपाध्यक्ष मुकुंद माधव, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## महाराष्ट्र सदन येथे तीन दिवसीय वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



महाराष्ट्राची समृद्ध वस्त्रपरंपरा दिल्लीकरांच्या भेटीला

महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, नागपूर (महाटेक्स) आणि येथील महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदनात आयोजित विशेष वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव श्वेता सिंघल यांच्या हस्ते झाले.

प्रगती मैदान येथील भारत मंडपममध्ये नुकत्याच झालेल्या ‘भारत टेक्स २०२६’च्या धर्तीवर महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रोद्योग परंपरेचा परिचय दिल्लीकरांना करून देण्यासाठी कस्तुरबा गांधी मार्गावरील नवीन महाराष्ट्र सदन येथे १८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत या तीन दिवसीय वस्त्रोद्योग प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती सिंघल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार आणि व्यवस्थापक प्रमोद कोलापटे उपस्थित होते. तसेच रेशीम संचालनालयाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे, रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे, अशोक वडवले, महाटेक्सचे गणेश ठाकूर, रूपेश खापेकर आदी उपस्थित होते. दिल्लीतील नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठ्या संख्येने भेट देऊन महाराष्ट्रातील विणकर आणि कारागिरांकडून दर्जेदार उत्पादने थेट खरेदी करून ‘व्होकल फॉर लोकल’ संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांनी केले.

‘भारत टेक्स २०२६’मध्ये महाराष्ट्राच्या दालनाला देश-विदेशातील खरेदीदारांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील विणकर, कारागिर आणि स्वयं-सहायता गटांनी तयार केलेली उत्पादने दिल्लीसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट ग्राहकांपर्यंत पोहोचावीत, तसेच महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रवारशाचा व्यापक प्रचार व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या पारंपरिक वस्त्रकलेचा समृद्ध वारसा अनुभवता येणार असून, अस्सल पैठणी, करवत काठी साड्या, पारंपरिक हिमरू, खण, सोलापूरच्या प्रसिद्ध चादरी, बांबू व टेरी टॉवेल्स तसेच जीआय (GI) टॅग प्राप्त कोल्हापुरी चपला यांसह विविध हातमाग व रेशीम उत्पादने थेट विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत.हे प्रदर्शन १८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ८ या वेळेत सर्व नागरिकांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.



## ‘मिशन ऑरेंज सिटी’ मोहिमेचा मुख्यमंत्र्यांकडून रामगिरी परिसरात संत्रावृक्षरोपणाने शुभारंभ

■ नागपूर (दै. संध्या)

‘मिशन ऑरेंज सिटी’ उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रामगिरी निवासस्थानी संत्रावृक्षरोपणाने मोहिमेचा शुभारंभ केला.

यावेळी महापौर नीता ठाकरे, आमदार परिणय फुके, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक अतुल पांडे तसेच अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. मिशन ऑरेंज सिटी हा उपक्रम दैनिक महाराष्ट्र टाईम्सतर्फे राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्र्यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पुरोगामी विद्यालयाचा 43 वर्धापन दिन विविध उपक्रमांनी साजरा

हवेली (दैनिक संध्या) : पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव ता हवेली या विद्यालयाचा ४३ वा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी शनिवार दिनांक १८/७/२०२६ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सुरुवातीला प्रसिद्ध व्याख्याते अशोक देशमुख यांचे आनंदी जीवन आणि हसत खेळत शिक्षण या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि हवेली पंचायत समितीचे सदस्य सुदर्शनभाऊ चौधरी यांनी विद्यार्थ्यांना वह्या व दप्तर वाटप केले.या वेळी सुदर्शनभाऊंनी सांगितले की आमच्या काळात ज्या शैक्षणिक सुविधा आम्हाला मिळाल्या नाहीत त्या सर्व सुविधा विद्यार्थ्यांना देण्याचा मी प्रयत्न करीन.त्याचप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार व एआय तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांना करता यावे यासाठी भविष्यात इंटरऍक्टीव स्मार्ट डिजिटल बोर्ड, विद्यालयाला सोलर सिस्टीम देण्यात येईल असे सांगितले. यावेळी विद्यालयात वाचन संस्कृती वाढावी व पर्यावरणाचे रक्षण करावे हा संदेश देत विठ्ठल नामाचा गजर भक्तीचा मळा फुलवत विद्यालय ते सोरतापवाडी असा दिंडी सोहळा साजरा केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्याते अशोक देशमुख, पंचायत समिती सदस्य सुदर्शनभाऊ चौधरी, प्रसिद्ध उद्योजक जी.बी.चौधरी , उरुळी कांचन ग्रामपंचायत सदस्य सुनील तांबे, सामाजिक कार्यकर्त्या शितल चौधरी हे उपस्थित होते. तर कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष रामदास चौधरी, सचिव रंगनाथ आप्पा कड, विश्वस्त दत्तात्रय चौधरी, सोनबा चौधरी, सुनील चोरघे, भिकाजी चौधरी, अनिल लोणकर, शिवाजी चौधरी, सामाजिक कार्यकर्ते बंडोपंत चौधरी, अजिंक्य चौधरी, बापूसाहेब लाड,सोनाशेठ कड, सुहास चौधरी, संतोष गोंडगिरे,बंडू गुंजाळ, मेघराज चौधरी, राहूल चोरघे, सुभाष आमले , शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा शिल्पा बिराजदार व अनेक पालक,माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.



### ॲम्बुलन्स - पिकअप यांच्यात जोरदार धडक; चालकाचा मृत्यू

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील कल्याण-नगर रस्त्यावर गायमुखवाडी येथे शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात रुग्णाला उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या ॲम्बुलन्सच्या चालकाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कुणाल तुकाराम डुंबरे वय ३१, रा. डुंबरवाडी, ता. जुन्नर हे ॲम्बुलन्स एमएच १४ एलबी ४३२९ चालवत खामुंडी येथील अपघातातील जखमी रुग्णाला आळेफाटा येथे उपचारासाठी घेऊन जात होते. रात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास गायमुखवाडी गावच्या हद्दीतील स्पीड ब्रेकरजवळ समोरून येणाऱ्या पिकअप एमएच २४ बीडब्ल्यू २०९२ ने ॲम्बुलन्सला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, ॲम्बुलन्स दोन ते तीन वेळा पलटी झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात ॲम्बुलन्स चालक कुणाल डुंबरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ॲम्बुलन्समधील रुग्ण गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातात ॲम्बुलन्सचेही मोठे नुकसान झाले. याप्रकरणी शेखर तुकाराम डुंबरे रा. डुंबरवाडी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिकअप चालक नीलकंठ फुलचंद गव्हाणे रा. शिराळा, जि. लातूर याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अपघातातील वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. पोलिसांनी पिकअप चालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. पुढील तपास ओतूर पोलीस करीत आहेत.

# आधी आता बाह्यवळण रस्ता करावा, मगच उड्डाणपूल

## वाघोलीकरांची महायुती सरकारकडे मागणी

कोरेगावमुळ (दै. संध्या)



वाघोली परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, उड्डाणपूल व मेट्रो प्रकल्पाच्या कामांना सुरुवात करण्यापूर्वी पर्यायी बाह्यवळण / आरपी (RP) रस्ता पूर्ण करावा, अशी मागणी वाघोलीकरांकडून करण्यात येत आहे. विकासाला विरोध नसून, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आधी पर्यायी रस्त्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे तसेच केंद्र व राज्यातील महायुती सरकारच्या प्रयत्नांतून देशभरात रस्ते,पूल आणि मेट्रोसारख्या पायाभूत सुविधा वेगाने उभारल्या जात आहेत. त्याचाच भाग म्हणून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) मार्फत वाघोली येथे उड्डाणपूल आणि मेट्रो प्रकल्पाला मंजुरी मिळाल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत सरकारचे आभार मानले आहेत. मात्र, गेल्या १५ वर्षांत वाघोलीची लोकसंख्या सुमारे पाचपट वाढल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ४ नंतर वाघोली चौकातून बाहेर पडण्यासाठी तब्बल एक ते दीड तास लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असून, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक,रुग्णवाहिका आणि नोकरदार वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांच्या मते, उड्डाणपूल आणि मेट्रोची कामे एकाच वेळी सुरु झाल्यास पर्यायी रस्ता नसल्यामुळे वाहतूक कोंडी आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.त्यामुळे 'आधी पायाभूत सुविधा, मग मोठे प्रकल्प' हे धोरण अवलंबून प्रथम बाह्यवळण/ आरपी रस्ता आणि वाघोली-नगर रोडवरील पर्यायी मार्ग पूर्ण करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

वाघोलीकरांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या प्रश्नात लक्ष घालून वाघोलीकरांना तातडीने दिलासा द्यावा,अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. नागरिकांनी, "विकासाला आमचा विरोध नाही; मात्र विकासाची कामे करताना नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. फिती कापणे नंतरही होईल,पण जनतेचा वेळ आणि संयम वाचवणे आज अधिक गरजेचे आहे,"अशी भावना वाघोलीकरण कडून व्यक्त केली जात आहे.

> पुणे ते शिरूर या होणाऱ्या उड्डाण पुलावरून वाहतूक करताना १ किलो मीटरला ९ रुपये प्रमाणे टोल आकारणी होणार आहे.आणि हा पूल झाल्यानंतर २५ वर्ष टोल आकारणी होणार आहे. त्यामुळे या होणाऱ्या पुलावरून होणारी वाहतूक ही सर्वसामान्यांना न परवडणारी वाहतूक ठरणार आहे. तसेच पुलाचे काम सुरू करण्यापूर्वी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बाह्यवळण रस्ताही यांनी केला नाही. त्यामुळे अधिकच वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागेल. यासाठी बाह्यवळण रस्त्याची उपाययोजना करणे गरजेचे ठरणार आहे.
>
> माजी उपसरपंच - राजेंद्र सातव पाटील.

### बारामती लोकसभा मतदार संघातील ग्रामीण भागात आरोग्यसेवा गावागावांत

बारामती (दै. संध्या)



ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती ही संस्था गेली पाच दशके ग्रामीण भागाचा शाश्वत विकास या माध्यमातून कृषी, शिक्षण,जलसंधारण, महिला प्रशिक्षणे,महिला बचत गट,महिला आरोग्य,महिला सबलीकरण अशा वेगवेगळ्या क्षेत्रामधे कार्य करीत आहे.याच कार्याचा एक भाग म्हणजे ग्रामीण महिला व त्यांचे आरोग्य या अनुषंगाने ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या दारातच आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम संस्थेने १९८० च्या दरम्यान संस्थेच्या वतीने राबविण्यात येत होता,आज या उपक्रमास ४५ वर्ष पूर्ण झाली असून आता परत नव्याने विस्तारित स्वरुपात ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट,बारामती यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक चेअरमन कै.अप्पासाहेब पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ बारामती लोकसभा मतदार संघात गाव व वाडीवस्ती या ठिकाणी मोबाईल ॲम्ब्युलन्स व्हॅनद्वारे नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी उपक्रम राबविण्यात येणार आहे.अशी माहिती संस्थेचे चेअरमन राजेंद्र दादा पवार व संस्थेच्या विश्वस्त सुनंदा पवार यांनी दिली. या उपक्रमाचा शुभारंभ आज संस्थेचे चेअरमन श्री.राजेंद्र पवार व संस्थेच्या विश्वस्त मा.सुनंदाताई पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना श्री. राजेंद्र पवार यांनी ग्रामीण भागातील सर्वसामान्य प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचा संस्थेचा संकल्प व्यक्त केला.आरोग्य सेवांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या विश्वस्त सुनंदाताई पवार यांनी बोलताना या मोबाईल आरोग्यसेवा उपक्रमांतर्गत गावांमधील सर्व नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी मोफत करण्यात येणार असून आवश्यकतेनुसार त्यांना औषधांचेही वितरण करण्यात येणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील वाडीवस्ती,दुर्गमभाग आरोग्य सुविधांपासून वंचित असलेल्या नागरिकांना या उपक्रमाचा मोठा लाभ होणार आहे. मोबाईल ॲम्ब्युलन्स व्हॅनद्वारे रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, तापमान तसेच इतर प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात येतील. आरोग्यविषयक मार्गदर्शनासह आवश्यक रुग्णांना पुढील उपचारांसाठी योग्य सल्लाही दिला जाणार आहे.

उद्घाटन प्रसंगी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे पदाधिकारी, अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी तसेच आरोग्य सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्रकल्प समन्वयक सचिन खलाटे यांनी केले.

यावेळी उपस्थित संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलावडे, समन्वयक प्रशांत तनपुरे, आर.बी.देशमुख, सागर शिंदे, डॉ.चैतन्य घोडके, डॉ.राहुल सरोदे, विना जाधव, डॉ.नवनाथ म्हस्के, डॉ.शंकर भडांगे, आकाश सावळकर महिला नागरिक, नर्सिंग विद्यार्थी उपस्थित होते.

### बारामतीत अजित दादा पवार यांच्या जयंतीदिनी होणार पुतळ्याचे लोकार्पण

बारामती (दै. संध्या)



दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पहिल्या पुतळ्याचे लोकार्पण गुरुवार दिनांक २३/०७/२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता मा.श्रीमती सुनेत्रा वहिनी पवार (उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांचे उपस्थितीत होणार आहे.या सोहळ्याप्रसंगी खासदार पार्थ पवार, युवानेते जय अजित पवार व पवार कुटुंबीय उपस्थित राहणार आहेत.

नटराज नाट्य कला मंडळ, बारामती या संस्थेच्यावतीने अजितदादांचा १० फुट उंची असलेला ब्राँझ धातूपासून बनवलेला पुतळा नटराज कलादालनाच्या समोरील जागेत बसविला जात आहे. दिनांक २२ जुलै २०२६ रोजी पुतळ्याचे पाद्य पूजन केले जाणार असून दिनांक २३ जुलै २०२६ रोजी पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे.तसेच याचवेळी अजितदादा यांच्या छायाचित्रांच्या दालनाचेही लोकार्पण होणार आहे.यावेळी सर्वधर्मिय प्रार्थना,श्रद्धांजली गीते,अभंग-भजन होणार आहे. या सोहळ्याप्रसंगी बारामती तसेच परिसरातील नागरिक,बंधू-भगिणी, कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे, अशी विनंती संस्थेचे अध्यक्ष श्री. किरण गुजर यांनी केली आहे.

### सोमवारी वैद्यकीय सेवा बंद राहणार

जेजुरी (दै. संध्या)

डोंबिवली येथील शास्त्रीनगर महापालिका रुग्णालयातील डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांवर झालेल्या भ्याड व अमानुष हल्ला निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र यांनी दिलेल्या सोमवार 20 रोजी एकदिवसीय बंदच्या हाकेला पुरंदर मेडिकल असोसिएशन संपूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे.

२० जुलै रोजी सकाळी ६:०० वाजल्यापासून ते मंगळवार दि. २१ जुलै २०२६ रोजी सकाळी ६:०० वाजेपर्यंत नियमित बाह्य रुग्ण तपासणी बंद ठेवण्यात येतील- अत्यावश्यक व आपत्कालीन सेवा सुरु राहतील.

या बंदमध्ये पुरंदरमधिल सर्व डॉक्टर्स सहभागी झालेले आहेत. यामुळे पुरंदरमधील सर्व डॉक्टरांचे अत्यावश्यक व आपत्कालिन सेवा व्यतिरिक्त इतर सर्व वैद्यकीय सेवा बंद रहातील असे पुरंदर मेडिकल एसोसिएशन चे डॉ. प्रवीण जगताप यांनी सांगितले.

### रामराव जगताप यांच्या स्मरणार्थ गुलाबवृक्ष लावून श्रद्धांजली

जेजुरी (दै. संध्या)




इंडियन रोझ सोसायटीचे माजी अध्यक्ष तसेच कोथळे येथील श्री मल्हार शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष कै. रामराव जगताप यांच्या समर्थनात विद्या महामंडळ प्रशालेतील गुलाब वृक्ष लावून श्रद्धांजली वाहण्यात आली.

कोथळे गावचे रहिवाशी तसेच पुणे येथील जगताप नर्सरीचे प्रमुख रामराव जगताप यांचे नुकतेच निधन झाले.त्यांचे संपूर्ण आयुष्य गुलाबाच्या संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी समर्पित होते. गुलाबाशी असलेले त्यांचे अतूट नाते लक्षात घेऊन शाळेच्या प्रांगणात गुलाबाची रोपे लावण्याचा उपक्रम राबविण्यात आला. त्यांच्या कार्याची आठवण कायम राहावी तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, या हेतुन विद्यालयाच्या परिसरात अनेक गुलाब वृक्ष लावण्यात आले.

यावेळी संस्थेचे पदाधिकारी. प्रमोद जगताप, ॲड. धनंजय भोईटे, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ राऊत, मुख्याध्यापक प्रशांत कदम तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी गुलाबाच्या रोपांचे संगोपन करण्याचा संकल्प करत स्वर्गीय रामराव जगताप यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

## कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, कान्हाटी संकुलात ‘आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू’ व्याख्यानमालेचे आयोजन

बारामती (दै. संध्या)



कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, कान्हाटी यांच्या वतीने आयोजित ‘आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू’ या प्रेरणादायी व्याख्यानमालेअंतर्गत सातव्या पुष्पाचे आयोजन उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. स्मिता सुरेश पाटील, प्राचार्या, कृष्णाई एन. के. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कात्रज, ता. करमाळा, जि. सोलापूर यांनी "मोठी स्वप्ने, योग्य सवयी आणि उज्ज्वल भविष्य" या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस ठेवावे, त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी योग्य सवयी, वेळेचे नियोजन, सातत्य, शिस्त, सकारात्मक विचार आणि आत्मविश्वास जोपासणे किती आवश्यक आहे, याचे प्रभावी उदाहरणांसह विवेचन केले. "यश ही एका दिवसाची घटना नसून, योग्य सवयींच्या सातत्यपूर्ण प्रवासाचे फलित असते," असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून संवाद साधला.

यावेळी बारामतीची कन्या कु. श्रावणी कुदळे हिने राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) मध्ये भारतातील मुलींमध्ये अव्वल स्थान प्राप्त करून बारामतीसह महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्याबद्दल संस्थेच्या वतीने तिचा विशेष उल्लेख करण्यात आला. तसेच तिच्या या उल्लेखनीय यशामागील आई-वडील तसेच सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. कु. श्रावणी कुदळे हिच्या जिद्द, सातत्य, परिश्रम आणि ध्येयवेड्या वृत्तीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून संस्थेतील विद्यार्थिनींनीही मोठी स्वप्ने पाहत कठोर परिश्रम, योग्य नियोजन आणि आत्मविश्वासाच्या बळावर सर्वोच्च यश संपादन करावे, अशी प्रेरणादायी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

ही व्याख्यानमाला संस्थेच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. श्रीम. सुनेत्रा (वहिनीसाहेब) अजितदादा पवार यांच्या प्रेरणेतून व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, करिअरविषयक दृष्टीकोन, जीवनमूल्यांची जपणूक आणि स्पर्धात्मक परीक्षांविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे हा या व्याख्यानमालेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ यांनी करून व्याख्यानमालेमागील उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कोमल चांदगुडे व श्री. अल्ताफ बागवान यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. प्रिती लोंढे यांनी मानले. कार्यक्रमाचे छायाचित्रण श्री. स्वप्नील धुमाळ यांनी केले.

यावेळी संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य, प्राचार्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देत ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आवश्यक असलेल्या योग्य सवयी, सातत्यपूर्ण परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा प्रभावी संदेश या व्याख्यानातून मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### जुन्नर न्यायालयात विशेष लोकअदालतमध्ये १३ प्रकरणांचा निपटारा

नारायणगाव (दै. संध्या)




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या सौजन्याने तसेच तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या वतीने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर येथे शनिवार (दि.१८) रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. जुन्नर न्यायालयातील लोकन्यायालयचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर जिल्हा न्यायाधीश १- एस.बी.शेलार साहेब यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी न्याय आपल्या दारी या संकल्पनेनुसार विधीसेवा प्राधिकरण आपल्यापर्यंत पोहोचत आहे. पक्षकारांनी लोक न्यायालयाच्या माध्यमातून आपली प्रलंबित प्रकरणे निकाली काढून आयुष्यातील महत्वाचा वेळ आणि पैसा वाचवावा असे आवाहन जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश एस. बी.शेलार साहेब यांनी केले.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी लोकन्यायालय पॅनल प्रमुख न्यायाधीश दिवाणी व फौजदारी न्यायालय जुन्नर न्यायाधीश अनंत एच. बाजड साहेब तसेच जुन्नर वकील बार असोसिएशन चे उपाध्यक्ष निलीमा शेरकर, लोक अदालत पॅनल सदस्य ॲड. अंजुम इनामदार तसेच पक्षकार उपस्थित होते. सदर विशेष लोकअदालतीकरिता परक्राम्य विलेख अधिनियम १८८१ कलम १३८ अन्वये प्रलंबित व दावा दाखल पूर्व बँकेची वसुली प्रकरणे, पतसंस्था, फायनान्सची प्रकरणे तडजोडी करिता ठेवण्यात आली होती दिवसभराच्या कामकाजात विशेष लोकअदालतीमध्ये दोन्ही बाजूच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून व त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात येऊन त्याद्वारे एकूण १३ प्रकरणे आपसी समझोता व तडजोड करून निकाली काढण्यात आली. यात प्रलंबित व दाखलपुर्व प्रकरणांतील रक्कम ३५ लाख ७७ हजार ९३३ रुपये रकमेची वसूली करण्यात आली.

विशेष लोकअदालत यशस्वी करण्याकरिता जिल्हा न्यायाधिश -१ एस.बी. शेलार साहेब व जुन्नर न्यायालयातील सर्व न्यायिक अधिकारी यांच्या मागदर्शनाखाली जुन्नर न्यायालयातील फौजदारी बंधावरील कर्मचारी यांनी कामकाज पाहिले ही लोकअदालत यशस्वी करण्याकरिता जुन्नर वकील बार असोसिएशनचे सदस्य पोलीस अधिकारी व कर्मचारी न्यायालयीन कर्मचारी, बँक, पतसंस्था, फायनान्स पक्षकार यांचे मोलाचे योगदान लाभले. सदर विशेष लोकअदालत जुन्नर न्यायालयामध्ये यशस्वी ठरले.